भारत सरकार

**विधि व न्याय मंत्रालय**

# विशेष विवाह अधिनियम, १९५४

**(सन १९५४ चा अधिनियम क्रमांक ४३)**

[ रोजी यथाविद्यमान ]

# The Special Marriage Act, 1954

**(No. 43 of 1954)**

**[** *As in force on the* **]**

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रीत व प्रकाशित केले
**२०१७**

[ **किंमत** : रुपये ------ ]

# विशेष विवाह अधिनियम, १९५४

## कलमांचा क्रम

**कलमे**


प्रकरण एक

**प्रारंभिक**

१ संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२ व्याख्या.

३ विवाह अधिकारी.

प्रकरण दोन

**विशेष विवाह विधिपूर्वक लावणे**

४ विशेष विवाह विधिपूर्वक लावण्याबाबतच्या शर्ती.

५ नियोजित विवाहाची नोटीस.

६ विवाह नोटीस नोंदवही व प्रसिद्धी.

७ विवाहास आक्षेप घेणे.

८ आक्षेप मिळाल्यानंतरची कार्यपद्धती.

९ चौकशीबाबत विवाह अधिकाऱ्यांचे अधिकार.

१० राज्यक्षेत्रांबाहेर असलेल्या विवाह अधिकाऱ्यांकडे आक्षेप आल्यावर करावयाची कार्यपद्धती.

११ पक्षांनी व साक्षीदारांनी अभिकथन करणे.

१२ विधिपूर्वक विवाह लावण्याची जागा व स्वरूप.

१३ विवाहाचे प्रमाणपत्र.

१४ तीन महिन्यांच्या आत विधिपूर्वक विवाह लावण्यात आला नसेल तेव्हा नवीन नोटीस देणे.

प्रकरण तीन

**अन्य प्रकारे लावलेल्या विवाहांची नोंदणी करणे**

१५ अन्य प्रकारे लावलेल्या विवाहांची नोंदणी करणे.

१६ नोंदणीची कार्यपद्धती.

१७ कलम १६ खालील आदेशांविरुद्ध अपिले करणे.

१८ या प्रकरणाअन्वये विवाहाची नोंदणी करण्याचा परिणाम.

प्रकरण चार

**या अधिनियमाअन्वये झालेल्या विवाहाचे परिणाम**

१९ अविभक्त कुटुंबाच्या सदस्यावर विवाहाचा परिणाम.

२० हक्क व निःसमर्थता यांवर अधिनियमाचा परिणाम न होणे.

२१ अधिनियमाखाली विवाहबद्ध झालेल्या पक्षांच्या मालमत्तेवरील उत्तराधिकार.

२१-क विवक्षित प्रकरणातील विशेष तरतूद.

प्रकरण पाच

**दांपत्याधिकारांचे प्रत्यास्थापन व न्यायिक फारकत**

२२ दांपत्याधिकारांचे प्रत्यास्थापन.

२३ न्यायिक फारकत.

प्रकरण सहा

**विवाहाची शून्यता व घटस्फोट**

२४ शून्य विवाह.

२५ शून्यकरणीय विवाह.

२६ शून्य व शून्यकरणीय विवाहातून जन्मलेल्या अपत्यांची औरसता.

२७ घटस्फोट.

२७-क घटस्फोटाच्या कार्यवाहीमध्ये वैकल्पिक अनुतोष.

२८ परस्पर संमतीने घटस्फोट घेणे.

२९ विवाहानंतर पहिल्या तीन वर्षांच्या आत घटस्फोटाच्या विनंतीअर्जावर निर्बंध असणे.

३० घटस्फोटित व्यक्तींचा पुनर्विवाह.

प्रकरण सात

**अधिकारिता व कार्यपद्धती**

३१ कोणत्या न्यायालयाकडे विनंतीअर्ज करावा.

३२ विनंतीअर्जाचा मजकूर व त्याचे सत्यापन.

३३ कार्यवाही कक्षांतर्गत होणे आणि ती मुद्रित वा प्रकाशित करता न येणे.

३४ हुकूमनामे काढणाऱ्या न्यायालयाचे कर्तव्य.

३५ घटस्फोटाच्या व इतर कार्यवाहींमध्ये उत्तरवादीला अनुतोष देणे.

३६ दावा प्रलंबित असताना पोटगी.

३७ स्थायी पोटगी व निर्वाह खर्च.

३८ अपत्यांचा ताबा.

३९ हुकूमनामे व आदेश यांवरील अपिले.

४० १९०८ चा अधिनियम ५ लागू करणे.

४०-क विवक्षित प्रकरणांमध्ये विनंतीअर्ज हस्तांतरित करण्याचे अधिकार.

४०-ख अधिनियमाखालील विनंतीअर्जांची न्याय चौकशी करण्याच्या आणि ते निकालात काढण्याच्या संबंधातील विशेष तरतुदी.

४०-ग लेखी साक्षीपुरावा.

४१ कार्यपद्धती विनियमित करण्यासाठी नियम करण्याचा उच्च न्यायालयाचा अधिकार.

प्रकरण आठ

**संकीर्ण**

४२ व्यावृत्ती.

४३ या अधिनियमाखाली पुन्हा विवाह करणाऱ्या विवाहित व्यक्तीला शिक्षा.

४४ द्विविवाहाबद्दल शिक्षा.

४५ खोटे अभिकथन किंवा प्रमाणपत्र यावर सही करण्याबद्दल शिक्षा.

४६ विवाह अधिकाऱ्याच्या अपकृतीबद्दल शिक्षा.

४७ विवाह प्रमाणपत्र नोंदवही निरीक्षणार्थ खुली ठेवणे.

४८ विवाह अभिलेखांमधील नोंदीच्या प्रती पाठवणे.

४९ चुकांची दुरुस्ती.

५० नियम करण्याचा अधिकार.

५१ निरसने व व्यावृत्ती.

पहिली अनुसूची

दुसरी अनुसूची

तिसरी अनुसूची

चौथी अनुसूची

पाचवी अनुसूची

# विशेष विवाह अधिनियम, १९५४

## (१९५४ चा अधिनियम क्रमांक ४३)[१]

[ रोजी यथाविद्यमान]

[९ ऑक्टोबर, १९५४]

**विवक्षित प्रकरणांत विशेष स्वरूपाचा विवाह, अशा प्रकारच्या आणि अन्य काही विवाहांची नोंदणी व घटस्फोट यांकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या पाचव्या वर्षी संसदेद्वारे तो पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

**संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

**१.** (१) या अधिनियमास विशेष विवाह अधिनियम, १९५४ असे म्हणावे.

(२) तो जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतास लागू आहे, आणि ज्या राज्यक्षेत्रांवर या अधिनियमाचा विस्तार आहे त्यांमध्ये अधिवासी असलेले भारताचे जे नागरिक [२][जम्मू व काश्मीर राज्यांमध्ये] असतील त्यांनाही तो लागू आहे.

(३) केंद्र सरकार **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा [३]दिनांकास तो अंमलात येईल.

**व्याख्या.**

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

[४]* * * *

(ख) "प्रतिषिद्ध नातेसंबंधाच्या श्रेणी".—एखादा पुरुष व पहिल्या अनुसूचीच्या भाग एक मध्ये उल्लेखिलेल्यांपैकी कोणतीही व्यक्ती आणि एखादी स्त्री व उक्त अनुसूचीच्या भाग दोन मध्ये उल्लेखिलेल्यांपैकी कोणतीही व्यक्ती प्रतिषिद्ध नातेसंबंधाच्या श्रेणींच्या अंतर्गत आहेत.

**स्पष्टीकरण एक.—** नातेसंबंध यात,—

(क) सापत्न नात्याचा किंवा सहोदर नात्याचा, तसेच सख्ख्या नात्याचा संबंध ;

(ख) अनौरस तसेच औरस रक्तसंबंध ;

(ग) दत्तकाचा तसेच रक्ताचा नातेसंबंध ;

यांचा समावेश आहे व या अधिनियमातील नातेसंबंधविषयक सर्व संज्ञांचा अर्थ तद्नुसार लावण्यात येईल.

**स्पष्टीकरण दोन.—** " सख्खे नाते " आणि " सापत्न नाते ".—जेव्हा दोन व्यक्तींचा एकाच पूर्वजापासून एकाच पत्नीच्याद्वारे वंशोद्भव झालेला असतो तेव्हा त्या सख्ख्या नात्याने एकमेकींशी संबंधित असल्याचे आणि जेव्हा त्यांचा एकाच पूर्वजापासून पण निरनिराळ्या पत्नींच्याद्वारे वंशोद्भव झालेला असतो तेव्हा त्या सापत्न नात्याने एकमेकींशी संबंधित असल्याचे म्हटले जाते.

**स्पष्टीकरण तीन.—** " सहोदर नाते ".—जेव्हा दोन व्यक्तींचा एकाच पूर्वजापासून पण निरनिराळ्या पतींच्याद्वारे वंशोद्भव झालेला असतो तेव्हा त्या सहोदर नात्याने एकमेकींशी संबंधित असल्याचे म्हटले जाते.

---

[१] हा अधिनियम, १९६३ चा अधिनियम ६, कलम २ व अनुसूची एक अन्वये दादरा आणि नगर हवेलीला आणि १९६३ चा अधिनियम ७, कलम ३ व अनुसूची एक अन्वये पाँडेचरीला लागू करण्यात आला.

[२] १९६९ चा अधिनियम क्रमांक ३३ याच्या कलम २९ अन्वये " उक्त प्रदेशांच्या बाहेर " याऐवजी दाखल करण्यात आला (३१ ऑगस्ट १९६९ रोजी व तेव्हापासून).

[३] १ जानेवारी १९५५ रोजी अंमलात आला. पहा–भारताचे असाधारण **राजपत्र**, १९५४, भाग दोन, विभाग २, यामध्ये इं.पृ. २४६३ वर प्रसिद्ध केलेली अधिसूचना क्रमांक एसआरओ. ३६०६, दिनांक १७ डिसेंबर १९५४.

[४] १९६९ चा अधिनियम क्रमांक ३३, कलम २९ द्वारे खंड (क) वगळण्यात आला (३१ ऑगस्ट १९६९ रोजी व तेव्हापासून).

**स्पष्टीकरण चार.—** स्पष्टीकरण दोन व तीन मध्ये “पूर्वज” यात पित्याचा व “पूर्वजा” यात मातेचा समावेश होतो ;

[१]* * * *

(घ) “जिल्हा” याचा विवाह अधिकाऱ्याच्या संबंधातील अर्थ, कलम ३ च्या पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) खाली असा अधिकारी म्हणून त्याची ज्यासाठी नियुक्ती करण्यात आली आहे ते क्षेत्र, असा आहे ;

[२][(ङ) “ जिल्हा न्यायालय ” याचा अर्थ, ज्याच्यासाठी नगर दिवाणी न्यायालय असेल अशा कोणत्याही क्षेत्रात ते न्यायालय, व अन्य कोणत्याही क्षेत्रात मूळ अधिकारितेचे प्रधान दिवाणी न्यायालय, असा आहे, आणि जे दिवाणी न्यायालय, या अधिनियमात परामर्श घेण्यात आलेल्या बाबींसंबंधात अधिकारिता असलेले न्यायालय म्हणून राज्य शासनाकडून **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट केले जाईल अशा अन्य कोणत्याही दिवाणी न्यायालयाचा त्यात समावेश आहे] ;

(च) “ विहित ” याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

[३][(छ) “ राज्य शासन ” याचा संघ राज्यक्षेत्राच्या संबंधातील अर्थ, त्या राज्याचा प्रशासक, असा आहे].

**विवाह अधिकारी.**

**३.** (१) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, राज्य शासनास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, संपूर्ण राज्याकरिता किंवा त्याच्या कोणत्याही भागाकरिता एक किंवा अनेक विवाह अधिकारी नियुक्त करता येतील.

[४][(२) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, ज्यावर या अधिनियमाचा विस्तार आहे अशा राज्यक्षेत्रांमध्ये अधिवासी असलेले भारताचे नागरिक जम्मू व काश्मीर राज्यांमध्ये आहेत त्यांना लागू करताना, केंद्र सरकारला **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्या राज्याकरिता किंवा त्याच्या कोणत्याही भागाकरिता, विवाह अधिकारी म्हणून त्यास योग्य वाटतील असे केंद्र सरकारचे अधिकारी विनिर्दिष्ट करता येतील.]

## प्रकरण दोन

## **विशेष विवाह विधिपूर्वक लावणे**

**विशेष विवाह विधिपूर्वक लावण्याबाबतच्या शर्ती.**

**४.** विवाह विधिपूर्वक लावण्यासंबंधी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, जर विवाहाच्या वेळी पुढील शर्ती पूर्ण करण्यात आल्या असतील तर, या अधिनियमाखाली कोणत्याही दोन व्यक्तींचा विवाह विधिपूर्वक लावता येईल :—

(क) कोणत्याही पक्षास हयात विवाहसाथी नाही ;

[५][(ख) विवाहाच्या वेळी कोणताही पक्ष,—

(एक) मनोविकलतेमुळे विवाहास विधिग्राह्य संमती देण्यास असमर्थ नाही ; किंवा

(दोन) विधिग्राह्य संमती देण्यास समर्थ असला तरी, विवाह करण्यास आणि संततीला जन्म देण्यास अपात्र ठरेल अशा प्रकारच्या वा अशा प्रमाणात त्याच्यात मानसिक बिघाड झालेला नाही ; किंवा

(तीन) त्याला वांरवार भ्रमिष्टपणाचे [६][* * * ] झटके येत नाही ;]

(ग) मुलाने वयाची एकवीस वर्षे आणि मुलीने वयाची अठरा वर्षे पूर्ण केलेली आहेत ;

[७][(घ) पक्ष प्रतिषिद्ध नातेसंबंधाच्या श्रेणीच्या अंतर्गत नाहीत :

परंतु असे की, उभय पक्ष प्रतिषिद्ध नातेसंबंधाच्या श्रेणींच्या अंतर्गत येत असले तरी, जेव्हा निदान एका पक्षाचे नियंत्रण करणाऱ्या रूढीद्वारे उभयतांमधील विवाहास मुभा दिलेली असेल तेव्हा असा विवाह विधिपूर्वक लावता येईल ; आणि]

[८][(ङ) असा विवाह जम्मू व काश्मीर राज्यामध्ये विधिपूर्वक लावला जात असेल तेव्हा, दोन्ही पक्ष ज्या राज्यक्षेत्रांवर या अधिनियमाचा विस्तार आहे त्या राज्यक्षेत्रांमधील अधिवासी असलेले भारताचे नागरिक आहेत.]

---

[१] १९६९ चा अधिनियम क्रमांक ३३, कलम २९ द्वारे खंड (ग) वगळण्यात आला (३१ ऑगस्ट १९६९ रोजी व तेव्हापासून).

[२] १९७६ चा अधिनियम क्रमांक ६८, कलम २० द्वारे खंड (ङ) ऐवजी दाखल करण्यात आला (२७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

[३] विधी अनुकूलन (क्र.३) आदेश, १९५६ याद्वारे खंड (छ) ऐवजी दाखल करण्यात आला.

[४] १९६९ चा अधिनियम क्रमांक ३३, कलम २९ द्वारे पोट-कलम (२) ऐवजी दाखल करण्यात आला (३१ ऑगस्ट १९६९ रोजी व तेव्हापासून).

[५] १९७६ चा अधिनियम क्रमांक ६८, कलम २१ द्वारे खंड (ख) ऐवजी दाखल करण्यात आला (२७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

[६] १९९९ चा अधिनियम क्रमांक ३९, कलम ३ द्वारे “किंवा अपस्मार” हा मजकूर वगळण्यात आला (२९ डिसेंबर १९९९ रोजी व तेव्हापासून).

[७] १९६३ चा अधिनियम क्रमांक ३२, कलम २ द्वारे खंड (घ) ऐवजी दाखल करण्यात आला (२२ सप्टेंबर १९६३ रोजी व तेव्हापासून).

[८] १९६९ चा अधिनियम क्रमांक ३३, कलम २९ द्वारे खंड (ङ) ऐवजी दाखल करण्यात आला (३१ ऑगस्ट १९६९ रोजी व तेव्हापासून).

[1][**स्पष्टीकरण.—** या कलमामध्ये "रूढी" याचा कोणत्याही जनजातीच्या, समूहाच्या, गटाच्या किंवा कुटुंबाच्या व्यक्तीच्या संबंधातील अर्थ, राज्य शासन या संबंधात **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्या जनजातीच्या, समूहाच्या, गटाच्या किंवा कुटुंबाच्या सदस्यांना लागू करण्यायोग्य म्हणून विनिर्दिष्ट करील असा कोणताही नियम, असा आहे :

परंतु असे की, राज्य शासनाची पुढील गोष्टींबाबत खात्री पटल्याशिवाय, ते, कोणतीही जनजाती, समूह, गट किंवा कुटुंब यांच्या सदस्यांच्या संबंधात अशी अधिसूचना काढणार नाही,—

(एक) अशा नियमाचे सदस्यांकडून दीर्घ काळापासून सातत्याने आणि एकरूपतेने पालन केले जात आहे ;

(दोन) असा नियम निश्चितपणे अस्तित्वात आहे आणि तो अवाजवी किंवा लोकनीतीच्या विरोधात नाही ; आणि

(तीन) असा नियम जर फक्त एका कुटुंबालाच लागू असेल तर त्या कुटुंबाकडून त्याचे सातत्याने पालन थांबवलेले नाही.]

**नियोजित विवाहाची नोटीस.**

**५.** जेव्हा या अधिनियमाखाली विधिपूर्वक विवाह लावण्याचे योजले असेल तेव्हा, विवाहातील पक्ष त्याची लेखी नोटीस अनुसूची दोनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यात, त्या जिल्ह्याच्या विवाह अधिकाऱ्यास देतील. मात्र विवाहबद्ध होणाऱ्या पक्षांपैकी निदान एक पक्ष अशी नोटीस ज्या दिनांकास दिली जाणार असेल त्याच्या लगतपूर्वी किमान तीस दिवस इतका काळ ज्या जिल्ह्यात राहिलेला असेल, त्या जिल्ह्याच्या विवाह अधिकाऱ्यास देतील.

**विवाह नोटीस नोंदवही व प्रसिद्धी.**

**६.** (१) विवाह अधिकारी, कलम ५ खाली देण्यात आलेल्या सर्व नोटिशी, आपल्या कार्यालयाच्या अभिलेखांबरोबर ठेवील व अशा प्रत्येक नोटिशीची सत्यप्रत विवाह नोटीस नोंदवही म्हणून त्या प्रयोजनार्थ विहित केलेल्या नोंदवहीत तात्काळ दाखल करील आणि अशी नोंदवही, तिचे निरीक्षण करण्याची इच्छा असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या निरीक्षणासाठी, सर्व वाजवी वेळी विनाशुल्क खुली राहील.

(२) विवाह अधिकारी, अशी प्रत्येक नोटीस, आपल्या कार्यालयात तिची एक प्रत एखाद्या ठळक जागी लावून प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील.

(३) जेव्हा नियोजित विवाहातील कोणताही एक पक्ष, कलम ५ खाली नोटीस दिलेल्या विवाह अधिकाऱ्यांच्या जिल्ह्याच्या स्थानिक सीमांमध्ये कायम स्वरूपात राहत नसेल तेव्हा, विवाह अधिकारी, असा पक्ष ज्या जिल्ह्याच्या सीमेमध्ये कायम स्वरूपात राहत असेल अशा जिल्ह्याच्या विवाह अधिकाऱ्याकडे अशा नोटिशीची एक प्रत पाठवण्याची देखील व्यवस्था करील व तद्नंतर तो विवाह अधिकारी त्याची एक प्रत आपल्या कार्यालयातील एखाद्या ठळक जागी लावण्याची व्यवस्था करील.

**विवाहास आक्षेप घेणे.**

**७.** (१) कोणत्याही व्यक्तीस, कलम ६ च्या पोटकलम (२) खाली ज्या दिनांकास अशी कोणतीही नोटीस प्रसिद्ध करण्यात आली असेल त्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, नियोजित विवाहामुळे कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या एका किंवा अधिक शर्तींचे उल्लंघन होईल या कारणावरून विवाहास आक्षेप घेता येईल.

(२) कलम ६ च्या पोटकलम (२) खाली नियोजित विवाहाची नोटीस ज्या दिनांकास प्रसिद्ध करण्यात आली असेल त्या दिनांकापासून तीस दिवस संपल्यानंतर, असा विवाह, पोटकलम (१) अनुसार त्यावर पूर्वीच आक्षेप घेण्यात आला नसेल तर, विधिपूर्वक लावता येईल.

(३) विवाह अधिकारी, विवाह नोटीस नोंदवहीत आक्षेपाच्या स्वरूपाची लेखी नोंद करील आणि जरूर तर, आक्षेप घेणाऱ्या व्यक्तीला ती नोंद वाचून व समजावून दिली जाईल आणि तिच्याकडून किंवा तिच्या वतीने त्यावर स्वाक्षरी करण्यात येईल.

**आक्षेप मिळाल्यानंतरची कार्यपद्धती.**

**८.** (१) जर नियोजित विवाहास कलम ७ खाली आक्षेप घेण्यात आला असेल तर, विवाह अधिकारी, त्याने आक्षेपाच्या प्रकरणाबाबत चौकशी करून अशा आक्षेपामुळे विवाह विधिपूर्वक लावण्यास प्रतिबंध होत नाही याबाबत त्याचे समाधान होईपर्यंत, अथवा आक्षेप घेणारी व्यक्ती तो मागे घेईपर्यंत विवाह विधिपूर्वक लावणार नाही ; परंतु, विवाह अधिकारी आक्षेपाच्या बाबींविषयी चौकशी करून निर्णय घेण्यासाठी, आक्षेपाच्या दिनांकापासून तीस दिवसांपेक्षा अधिक कालावधी घेणार नाही.

(२) जर विवाह अधिकाऱ्याने आक्षेप मान्य केला असेल आणि विधिपूर्वक विवाह लावण्यास नकार दिला असेल तर, नियोजित विवाहातील कोणत्याही पक्षास, असा नकार मिळाल्यापासून तीस दिवसांच्या कालावधीत विवाह अधिकाऱ्याचे कार्यालय ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये येत असेल अशा जिल्हा न्यायालयाकडे अपील दाखल करता येईल. अशा अपिलावरील जिल्हा न्यायालयाचा निर्णय अंतिम असेल आणि विवाह अधिकारी न्यायालयाच्या निर्णयानुरूप कार्यवाही करील.

---

[1] १९६३ चा अधिनियम क्रमांक ३२, कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले (२२ सप्टेंबर १९६३ रोजी व तेव्हापासून).

**चौकशीबाबत विवाह अधिकाऱ्यांचे अधिकार.**

**९.** (१) कलम ८ खालील कोणत्याही चौकशीच्या प्रयोजनार्थ, दाव्याची न्यायचौकशी करताना, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ याअन्वये दिवाणी न्यायालयाकडे निहित असतील असे सर्व अधिकार विवाह अधिकाऱ्यास खालील बाबीसंबंधी असतील, ते असे :— **१९०८ चा ५.**

(क) साक्षीदारांना उपस्थित राहण्यासाठी समन्स पाठवणे व त्यांना उपस्थित राहण्यास भाग पाडणे आणि त्यांची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) शोध व निरीक्षण;

(ग) दस्तऐवज सादर करण्यास भाग पाडणे ;

(घ) शपथपत्रावर दिलेला साक्षीपुरावा स्वीकारणे ; आणि

(ङ) साक्षीदारांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे काढणे.

तसेच, विवाह अधिकाऱ्यांपुढील कोणतीही कार्यवाही भारतीय दंड संहिता याच्या कलम १९३ च्या अर्थान्तर्गत न्यायिक कार्यवाही असल्याचे मानले जाईल. **१८६० चा ४५.**

**स्पष्टीकरण.—**साक्ष देण्यासाठी कोणत्याही व्यक्तीला उपस्थित राहण्यास भाग पाडण्याकरता, विवाह अधिकाऱ्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमा ह्या त्याच्या जिल्ह्याच्या स्थानिक सीमा असतील.

(२) नियोजित विवाहाला घेण्यात आलेला आक्षेप संयुक्तिक नाही व तो सद्भावपूर्वक घेण्यात आलेला नाही असे जर विवाह अधिकाऱ्याला दिसून आले तर, त्याला, आक्षेप घेणाऱ्या व्यक्तीवर भरपाईच्या रूपाने एक हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल इतका खर्च लादता येईल आणि त्या खर्चाची संपूर्ण रक्कम किंवा तिचा कोणताही भाग नियोजित विवाहातील पक्षांना देता येईल, आणि याप्रमाणे खर्चाबाबत दिलेल्या कोणत्याही आदेशाची अंमलबजावणी ही, विवाह अधिकाऱ्याचे कार्यालय ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये येत असेल अशा जिल्हा न्यायालयाने दिलेल्या हुकूमनाम्याची ज्या रीतीने अंमलबजावणी होते त्याच रीतीने करता येईल.

**राज्यक्षेत्रांबाहेर असलेल्या विवाह अधिकाऱ्यांकडे आक्षेप आल्यावर करावयाची कार्यपद्धती.**

**१०.** ज्या राज्यक्षेत्राना हा अधिनियम लागू होतो त्या राज्यक्षेत्रांबाहेरील विवाह अधिकाऱ्याकडे अशा राज्यक्षेत्राबाहेरील नियोजित विवाहाच्या बाबतीत कलम ७ खाली आक्षेप घेण्यात आला असेल, आणि विवाह अधिकाऱ्याने या बाबतीत त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, त्याबाबत त्यास शंका वाटत असेल तर, तो विधिपूर्वक विवाह न लावता, या प्रकरणाच्या बाबतीत त्यास योग्य वाटेल अशा निवेदनासह केंद्र सरकारकडे अभिलेख पाठवील आणि केंद्र सरकार त्या बाबतीत त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर व योग्य असा सल्ला घेतल्यानंतर, विवाह अधिकाऱ्यास त्यावरील आपला लेखी निर्णय कळवील आणि विवाह अधिकारी केंद्र सरकारच्या अशा निर्णयानुरूप कार्यवाही करील.

**पक्षांनी व साक्षीदारांनी अभिकथन करणे.**

**११.** विवाह विधिपूर्वक लावण्यापूर्वी पक्ष व तीन साक्षीदार या अधिनियमाच्या अनुसूची तीनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यामधील अभिकथनावर विवाह अधिकाऱ्याच्या समक्ष सह्या करतील व विवाह अधिकारी ते प्रतिस्वाक्षरित करील.

**विधिपूर्वक विवाह लावण्याची जागा व स्वरूप.**

**१२.** (१) विधिपूर्वक विवाह हा, विवाह अधिकाऱ्याच्या कार्यालयात किंवा पक्षांची इच्छा असेल अशा, तेथपासून वाजवी अंतरावरील कोणत्याही जागी आणि विहित केल्या जातील अशा शर्तींवर व अशी जादा फी भरल्यावर, लावता येईल.

(२) पक्ष पसंत करतील अशा कोणत्याही प्रकारे विधिपूर्वक विवाह लावता येईल :

परंतु असे की, प्रत्येक पक्षाने विवाह अधिकाऱ्याच्या व तीन साक्षीदारांच्या समक्ष व पक्षांना समजणाऱ्या कोणत्याही भाषेत, एका पक्षाने दुसऱ्याला उद्देशून— "मी (क), तुमचा (ख चा) माझी कायदेशीर पत्नी म्हणून [किंवा मी (क) तुमचा (ख चा) माझे कायदेशीर पती म्हणून] स्वीकार करीत आहे" असे म्हटल्याशिवाय तो विवाह पूर्ण होणार नाही व पक्षांवर बंधनकारक असणार नाही.

**विवाहाचे प्रमाणपत्र.**

**१३.** (१) जेव्हा विधिपूर्वक विवाह लावण्यात आला असेल तेव्हा, विवाह अधिकारी, त्याने त्या प्रयोजनासाठी ठेवावयाच्या व विवाह प्रमाणपत्र नोंदवही म्हणून संबोधल्या जाणाऱ्या नोंदवहीत अनुसूची चारमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यामधील अशा विवाह प्रमाणपत्राची नोंद करील आणि अशा प्रमाणपत्रावर विवाहातील पक्ष व तीन साक्षीदार सह्या करतील.

(२) विवाह अधिकाऱ्याने विवाह प्रमाणपत्र नोंदवहीत विवाह प्रमाणपत्राची नोंद केल्यावर, असे प्रमाणपत्र, या अधिनियमाअन्वये विधिपूर्वक विवाह लावण्यात आला आहे व साक्षीदारांच्या सह्यांबाबतच्या सर्व औपचारिकता पूर्ण करण्यात आल्या आहेत या वस्तुस्थितीचा निर्णायक पुरावा असल्याचे मानले जाईल.

**१४.** जेव्हा कलम ५ द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे विवाह अधिकाऱ्यास विवाहाची नोटीस दिल्याच्या दिनांकापासून तीन कॅलेंडर महिन्यांच्या आत किंवा जेथे कलम ८ च्या पोटकलम (२) खाली अपील दाखल करण्यात आले असेल तेथे अशा अपिलावर जिल्हा न्यायालयाचा निर्णय झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत, किंवा जेथे कलम १० खाली अशा विवाहाच्या प्रकरणाचा अभिलेख केंद्र सरकारकडे पाठवण्यात आला असेल तेथे केंद्र सरकारच्या निर्णयाच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत विधिपूर्वक विवाह लावण्यात आला नसेल तेव्हा, नोटीस व त्यामुळे उद्‌भवलेल्या अन्य सर्व कार्यवाह्या व्यपगत झाल्या असल्याचे मानले जाईल आणि या अधिनियमात निर्धारित केलेल्या रीतीने नवी नोटीस दिली जाईपर्यंत कोणताही विवाह अधिकारी असा विधिपूर्वक विवाह लावणार नाही. **तीन महिन्यांच्या आत विधिपूर्वक विवाह लावण्यात आला नसेल तेव्हा नवीन नोटीस देणे.**

## प्रकरण तीन

## अन्य प्रकारे लावलेल्या विवाहांची नोंदणी करणे

१८७२ चा ३. **१५.** [१]विशेष विवाह अधिनियम, १८७२, या अन्वये किंवा या अधिनियमाअन्वये विधिपूर्वक लावण्यात आलेल्या विवाहाशिवाय या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी वा त्यानंतर लावण्यात आलेल्या अन्य कोणत्याही विवाहाची नोंदणी खालील शर्ती पूर्ण करण्यात आल्या असतील तर, या अधिनियमाचा विस्तार असलेल्या राज्यक्षेत्रांतील विवाह अधिकाऱ्याकरवी, या प्रकरणाअन्वये, करता येईल :— **अन्य प्रकारे लावलेल्या विवाहांची नोंदणी करणे.**

(क) उभय पक्षांमध्ये विवाह विधि करण्यात आला असून तेव्हापासून ते पती-पत्नी म्हणून एकत्र राहत आहेत ;

(ख) नोंदणीच्या वेळी कोणत्याही पक्षास एकाहून अधिक हयात विवाहसाथी नाहीत ;

(ग) नोंदणीच्या वेळी कोणताही पक्ष जन्मजड किंवा वेडा नाही ;

(घ) नोंदणीच्या वेळी पक्षांच्या वयाला एकवीस वर्षे पूर्ण झालेली आहेत ;

(ङ) पक्ष प्रतिषिद्ध नातेसंबंधाच्या श्रेणींच्या अंतर्गत येत नाहीत :

परंतु असे की, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी लावलेल्या विवाहाच्या बाबतीत ही शर्त, त्यांपैकी प्रत्येकाचे नियंत्रण करणाऱ्या व उभयतांमधील विवाहास परवानगी देणाऱ्या कोणत्याही कायद्याच्या अथवा कायद्याप्रमाणे प्रभावी असलेल्या रूढीच्या किंवा परिपाठाच्या अधीन असेल ; आणि

(च) पक्ष, विवाहाच्या नोंदणीसाठी विवाह अधिकाऱ्यांकडे अर्ज केल्याच्या दिनांकाच्या निकटपूर्वी किमान तीस दिवस इतका काळ विवाह अधिकाऱ्याच्या जिल्ह्यात राहत आहेत.

**१६.** विवाहातील उभय पक्षांनी, या प्रकरणाअन्वये आपल्या विवाहाची नोंदणी करण्यासाठी सह्या केलेला अर्ज मिळाल्यावर, विवाह अधिकारी, विहित करण्यात येईल अशा रीतीने त्याची जाहीर नोटीस देईल आणि आक्षेपांसाठी तीस दिवसांची मुदत दिल्यानंतर व त्या मुदतीत आलेल्या कोणत्याही आक्षेपाची सुनावणी केल्यानंतर कलम १५ मध्ये उल्लेखिलेल्या सर्व शर्ती पूर्ण करण्यात आल्या आहेत, याबाबत जर त्याचे समाधान झाले तर, तो अनुसूची पाचमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यामधील 'विवाह प्रमाणपत्र' नोंदवहीत विवाह प्रमाणपत्राची नोंद करील आणि अशा प्रमाणपत्रावर विवाहातील पक्ष व तीन साक्षीदार सह्या करतील. **नोंदणीची कार्यपद्धती.**

**१७.** या प्रकरणाअन्वये विवाहाची नोंदणी करण्यास नकार देणाऱ्या विवाह अधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला, विवाह अधिकाऱ्याचे कार्यालय ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये येत असेल अशा जिल्हा न्यायालयाकडे, आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, त्या आदेशाविरुद्ध अपील करता येईल आणि अशा अपिलावरील जिल्हा न्यायालयाचा निर्णय अंतिम असेल, आणि ज्या विवाह अधिकाऱ्याकडे अर्ज केला होता तो विवाह अधिकारी अशा निर्णयानुरूप कार्यवाही करील. **कलम १६ खालील आदेशांविरुद्ध अपिले करणे.**

**१८.** कलम २४च्या पोटकलम (२) मध्ये अंतर्भूत केलेल्या तरतुदींच्या अधीनतेने, या प्रकरणाअन्वये विवाह प्रमाणपत्र नोंदवहीत अंतिमरीत्या विवाह प्रमाणपत्राची नोंद करण्यात आली असेल त्याबाबतीत असा विवाह, अशी नोंद केल्याच्या दिनांकापासून, या अधिनियमाखाली विधिपूर्वक लावण्यात आला आहे असे मानले जाईल व विवाह लावल्याच्या दिनांकानंतर जन्मलेली सर्व अपत्ये (त्यांची नावेदेखील विवाह प्रमाणपत्र नोंदवहीत दाखल करण्यात येतील) सर्व बाबतीत आपल्या मातापित्याची औरस अपत्ये असल्याचे आणि नेहमीच ती तशी असल्याचे मानले जाईल : **या प्रकरणाअन्वये विवाहाची नोंदणी करण्याचा परिणाम.**

परंतु असे की, अशी कोणतीही अपत्ये हा अधिनियम संमत झाला नसता तर, त्यांच्या माता-पित्याची अपत्ये नसल्याच्या कारणावरून त्यांच्या माता-पित्याहून अन्य कोणत्याही व्यक्तीच्या मालमत्तेत किंवा तीवर हक्क धारण करण्यास किंवा संपादन करण्यास अक्षम झाली असती अशा कोणत्याही प्रकरणी, या कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे अशा अपत्यांना असे कोणतेही हक्क प्रदान होतात असा त्याचा अर्थ लावला जाणार नाही.

---

[१] या अधिनियमाच्या कलम ५१ द्वारे निरसित.

प्रकरण चार

## या अधिनियमाअन्वये झालेल्या विवाहाचे परिणाम

**अविभक्त कुटुंबाच्या सदस्यावर विवाहाचा परिणाम.**

**१९.** हिंदू, बौद्ध, शीख किंवा जैन धर्माच्या अनुयायी म्हणवणाऱ्या अविभक्त कुटुंबाच्या ज्या कोणत्याही सदस्याचा या अधिनियमानुसार विधिपूर्वक विवाह लावण्यात आला असेल त्या सदस्याचे, अशा विवाहामुळे, कुटुंबापासून संबंध तुटले असल्याचे मानले जाईल.

**हक्क व निःसमर्थता यांवर अधिनियमाचा परिणाम न होणे.**

**२०.** कलम १९ च्या तरतुदींच्या अधीनतेने, या अधिनियमाअन्वये विधिपूर्वक विवाह लावण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही मालमत्तेवरील उत्तराधिकाराच्या संबंधात, जिला जातीय निःसमर्थता निवारण अधिनियम, १८५० लागू होतो अशा व्यक्तीप्रमाणेच हक्क असतील व त्याच निःसमर्थतांना ती अधीन असेल. **१८५० चा २१.**

**अधिनियमाखाली विवाहबद्ध झालेल्या पक्षांच्या मालमत्तेवरील उत्तराधिकार.**

**२१.** भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ यामध्ये विवक्षित समाजाच्या सदस्यांना तो लागू करण्याबाबत कोणतेही निर्बंध अंतर्भूत असले तरी, जिचा विवाह या अधिनियमाअन्वये विधिपूर्वक लावण्यात आला आहे अशा कोणत्याही व्यक्तीच्या मालमत्तेवरील व अशा विवाहापासून झालेल्या संततीच्या मालमत्तेवरील उत्तराधिकार उक्त अधिनियमाच्या तरतुदींद्वारे विनियमित होईल व या कलमाच्या प्रयोजनांसाठी, तो अधिनियम, जणू काही त्यातून भाग पाचचे प्रकरण तीन (मृत्युपत्र न करता मरण पावणाऱ्या पारसी व्यक्तींसाठी विशेष नियम) गाळले असावे त्याप्रमाणे परिणामकारक होईल. **१९२५ चा ३९.**

**विवक्षित प्रकरणातील विशेष तरतूद.**

[1][**२१क.** हिंदू, बौद्ध, शीख किंवा जैन धर्माची अनुयाची म्हणवणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा या अधिनियमाअन्वये विधिपूर्वक विवाह हा हिंदू, बौद्ध, शीख किंवा जैन धर्माची अनुयायी म्हणवणाऱ्या व्यक्तींबरोबर झालेला असेल त्या बाबतीत, त्यांना कलम १९ व कलम २१ लागू होणार नाही आणि जी निःसमर्थता कलम २० मुळे निर्माण होईल ती देखील लागू होणार नाही.]

प्रकरण पाच

## दांपत्याधिकारांचे प्रत्यास्थापन व न्यायिक फारकत

**दांपत्याधिकारांचे प्रत्यास्थापन.**

**२२.** जेव्हा पती किंवा पत्नी वाजवी कारणाशिवाय दुसऱ्या पक्षाच्या सहवासापासून दूर झाली असेल तेव्हा, व्यथित झालेल्या पक्षाला दांपत्याधिकारांच्या प्रत्यास्थापनासाठी जिल्हा न्यायालयाकडे विनंतीअर्ज करता येईल, आणि अशा विनंतीअर्जात केलेल्या निवेदनांच्या सत्यासत्यतेबाबत व अर्ज मंजूर का करण्यात येऊ नये यास कोणताही कायदेशीर आधार नसल्याबाबत न्यायालयाची खात्री पटल्यावर, त्याला तद्नुसार दांपत्याधिकारांच्या प्रत्यास्थापनाचा हुकूमनामा काढता येईल.

[2][**स्पष्टीकरण.**—सहवासापासून दूर होण्यास वाजवी कारण होते किंवा कसे असा प्रश्न उपस्थित झाल्यास, त्याबाबतीत असे वाजवी कारण सिद्ध करण्याचा भार जी व्यक्ती सहवासापासून दूर झाली असेल तिच्यावर राहील.]

**न्यायिक फारकत.**

**२३.** (१) पतीला किंवा पत्नीला—

(क) कलम २७ च्या [3][पोटकलम (१) ] [4][आणि पोटकलम (१क) मध्ये ] विनिर्दिष्ट केलेल्या ज्या कारणांवरून घटस्फोटाचा अर्ज सादर करता आला असता त्यांपैकी कोणत्याही कारणांवरून ; किंवा

(ख) दांपत्याधिकारांच्या प्रत्यास्थापनाच्या हुकूमनाम्याचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरून ;

न्यायिक फारकतीसाठी जिल्हा न्यायालयाकडे विनंतीअर्ज सादर करता येईल आणि अशा विनंती–अर्जात केलेल्या निवेदनांच्या सत्यासत्यतेबाबत व अर्ज मंजूर का करण्यात येऊ नये यास कोणताही कायदेशीर आधार नसल्याबाबत न्यायालयाची खात्री पटल्यावर त्याला तद्नुसार न्यायिक फारकतीचा हुकूमनामा काढता येईल.

(२) न्यायालय न्यायिक फारकतीचा हुकूमनामा देईल त्याबाबतीत, त्यानंतर उत्तरवादीबरोबर दांपत्यभावाने राहणे विनंतीअर्जदारावर बंधनकारक असणार नाही, पण कोणत्याही पक्षाने विनंतीअर्ज केल्यावर आणि अशा विनंतीअर्जात केलेल्या निवेदनांच्या सत्यासत्यतेबाबत न्यायालयाचे समाधान झाल्यावर जर न्यायालयाला हुकूमनामा रद्द करणे न्याय्य व वाजवी वाटले तर त्याला तो हुकूमनामा रद्द करता येईल.

---

[1] १९७६ चा अधिनियम क्रमांक ६८, कलम २२ द्वारे समाविष्ट करण्यात आले (२७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

[2] वरील अधिनियमाच्या कलम २३ द्वारे समाविष्ट करण्यात आले (२७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

[3] १९७० चा अधिनियम क्रमांक २९, कलम २ द्वारे विवक्षित मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (१२ ऑगस्ट १९७० रोजी व तेव्हापासून).

[4] १९७६ चा अधिनियम क्रमांक ६८, कलम २४ द्वारे दाखल करण्यात आला (२७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

प्रकरण सहा

## विवाहाची शून्यता व घटस्फोट

**२४.** (१) या अधिनियमाखाली विधिपूर्वक लावण्यात आलेला कोणताही विवाह— **शून्य विवाह.**

(एक) कलम ४ च्या खंड (क), (ख), (ग) आणि (घ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींपैकी कोणतीही शर्त पूर्ण करण्यात आली नसेल तर ; किंवा

(दोन) विवाहाच्या वेळी व दावा दाखल करण्याच्या वेळी उत्तरवादी नपुंसक असेल तर,

रद्दबातल ठरेल [१][आणि त्यातील कोणत्याही पक्षाने दुसऱ्या पक्षाविरुद्ध विनंतीअर्ज सादर केल्यावर] विवाह शून्यतेच्या हुकूमनाम्याद्वारे तो रद्दबातल झाल्याचे घोषित करता येईल.

(२) या कलमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट कलम १८ च्या अर्थांतर्गत या अधिनियमाखाली जो विवाह विधिपूर्वक लावण्यात आल्याचे मानले गेले असेल अशा कोणत्याही विवाहास लागू होणार नाही, परंतु अशा कोणत्याही विवाहाची प्रकरण तीन अन्वये केलेली नोंदणी जर कलम १५ चे खंड (क) ते (ङ) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करून केलेली असेल तर ती परिणामक नसल्याचे घोषित करता येईल :

परंतु असे की, जेथे कलम १७ अन्वये अपील दाखल करण्यात आले असेल आणि जिल्हा न्यायालयाचा अंतिम निर्णय झाला असेल अशा कोणत्याही प्रकरणी अशी कोणतीही घोषणा केली जाणार नाही.

**२५.** या अधिनियमाखाली विधिपूर्वक लावण्यात आलेला कोणताही विवाह, जर— **शून्यकरणीय विवाह.**

(एक) विवाहाची परिपूर्ती करण्यास उत्तरवादीने बुद्धिपुरस्सर नकार दिल्यामुळे विवाहाची परिपूर्ती झालेली नसेल तर ; किंवा

(दोन) विवाहाच्या वेळी उत्तरवादी स्त्री विनंतीअर्जदाराहून अन्य एखाद्या व्यक्तीपासून गरोदर राहिली असेल तर ; किंवा

**१८७२ चा ९.** (तीन) विवाहातील कोणत्याही पक्षाची संमती, भारतीय संविदा अधिनियम, १८७२ यांमध्ये व्याख्या केल्याप्रमाणे जबरदस्तीने किंवा कपटाने मिळवण्यात आली असेल तर,

शून्यकरणीय होईल व विवाह शून्यतेच्या हुकूमनाम्याद्वारे तो रद्दबातल करता येईल :

परंतु असे की, खंड (दोन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रकरणी,—

(क) विवाहाच्या वेळी विनंतीअर्जदार अभिकथित वस्तुस्थितीबाबत अनभिज्ञ होता ;

(ख) विवाहाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत कार्यवाही दाखल करण्यात आली होती ; आणि

(ग) हुकूमनाम्याकरता कारणे अस्तित्वात असल्याचे विनंतीअर्जदाराच्या नजरेस आल्यापासून विनंतीअर्जदाराच्या संमतीने वैवाहिक संभोग घडून आलेला नाही ;

याबाबत न्यायालयाची खात्री पटल्याशिवाय न्यायालय हुकूमनामा देणार नाही :

परंतु आणखी असे की, खंड (तीन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रकरणी, जर—

(क) जबरदस्ती करण्याचे थांबल्यानंतर, किंवा, यथास्थिति, कपट नजरेस आल्यानंतर एक वर्षाच्या आत कार्यवाही दाखल करण्यात आलेली नसेल ; किंवा

(ख) जबरदस्ती करण्याचे थांबल्यानंतर, किंवा, यथास्थिति, कपट नजरेस आल्यानंतर विनंतीअर्जदार त्याच्या किंवा तिच्या मुक्त संमतीने दुसऱ्या विवाह पक्षाबरोबर पती किंवा पत्नी म्हणून राहिला/राहिली असेल,

तर न्यायालय हुकूमनामा देणार नाही.

---

[१] १९७६ चा अधिनियम क्रमांक ६८, कलम २५ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (२७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

**शून्य व शून्यकरणीय विवाह संबंधातून जन्मलेल्या अपत्यांची औरसता.**

[1][२६. (१) कलम २४ खाली एखादा विवाह शून्य व रद्दबातल असला तरीसुद्धा, अशा विवाह संबंधातून झालेले जे अपत्य, तो विवाह विधीग्राह्य असता तर औरस ठरले असते असे कोणतेही अपत्य औरसच ठरेल,— मग ते अपत्य, विवाहविषयक कायदे (सुधारणा) अधिनियम, १९७६ याच्या प्रारंभापूर्वी जन्मलेले असो, वा नंतर जन्मलेले असो आणि त्या विवाहाच्या बाबतीत या अधिनियमाअन्वये विवाह शून्यतेचा हुकूमनामा देण्यात आलेला असो वा नसो आणि या अधिनियमाखाली विनंतीअर्ज केल्यावरून नव्हे तर अन्यथा तो विवाह रद्दबातल ठरविण्यात आलेला असो वा नसो. **१९७६ चा ६८.**

(२) शून्यकरणीय विवाहाबाबत कलम २५ खाली विवाह शून्यतेचा हुकूमनामा देण्यात आलेला असेल त्याबाबतीत, तो हुकूमनामा करण्यापूर्वी जन्मास घातलेले किंवा गर्भावस्थेत असलेले जे अपत्य, हुकूमनाम्याच्या दिनांकास विवाह शून्य ठरण्याऐवजी त्याचा विच्छेद झाला असता तर त्या विवाहातील दोन्ही पक्षांचे, औरस अपत्य ठरले असते असे कोणतेही अपत्य विवाह शून्यतेचा हुकूमनामा काढला असला तरी सुद्धा त्या पक्षांचे औरस अपत्य असल्याचे मानले जाईल.

(३) जो विवाह रद्दबातल झाला आहे किंवा कलम २५ खाली विवाह शून्यतेच्या हुकूमनाम्याद्वारे शून्यवत झाला आहे अशा विवाहाच्या संबंधातून जन्मलेले कोणतेही अपत्य, हा अधिनियम संमत झाला नसता तर असे अपत्य त्याच्या मातापित्यांचे औरस अपत्य नसल्याच्या कारणावरून त्याच्या मातापित्यांहून अन्य अशा कोणत्याही व्यक्तींच्या मालमत्तेत किंवा मालमत्तेवरील कोणतेही हक्क धारण करण्यास किंवा संपादन करण्यास अक्षम ठरले असते अशा कोणत्याही प्रकरणी, पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) मध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे अशा अपत्याला असे कोणतेही हक्क प्रदान होतात असा तिचा अर्थ लावला जाणार नाही.]

**घटस्फोट.**

२७. [2][(१)] या अधिनियमातील तरतुदींच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या अधीनतेने, पतीला किंवा पत्नीला पुढील कारणांवरून, घटस्फोटासाठी, जिल्हा न्यायालयाकडे विनंतीअर्ज सादर करता येईल—

[3][(क) उत्तरवादीने विधिपूर्वक विवाह झाल्यानंतर त्याच्या किंवा तिच्या विवाहसाथी व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीशी स्वेच्छेने संभोग केलेला आहे ; किंवा

(ख) विनंतीअर्ज सादर करण्याच्या निकटपूर्वी दोन वर्षांहून कमी नसेल अशा कालावधीसाठी उत्तरवादीने विनंतीअर्जदाराचा अभित्याग केलेला आहे ; किंवा]

(ग) उत्तरवादी 'भारतीय दंड संहिता', यामध्ये व्याख्या केली असेल अशा अपराधाबद्दल सात वर्षांची किंवा त्याहून अधिक कारावासाची शिक्षा भोगत आहे ; **१८६० चा ४५.**

[4][* * *]

(घ) दुसऱ्या पक्षाने विधिपूर्वक विवाह झाल्यानंतर विनंती अर्जदाराला क्रूरपणाची वागणूक दिली आहे ; किंवा

[5][(ङ) दुसऱ्या पक्षाला असाध्य असे मनोवैकल्य आले आहे किंवा तो सतत वा अधूनमधून अशाप्रकारे मनोविकृतीने ग्रस्त असतो, आणि त्या विकृतीचे गांभीर्य इतके आहे की विनंतीअर्जदार हा उत्तरवादीबरोबर राहवा अशी अपेक्षा करणे वाजवी ठरणार नाही.

**स्पष्टीकरण.–** या खंडात,

(क) "मनोविकृती" याचा अर्थ मानसिक आजार, मनाचा अवरुद्ध वा अपूर्ण विकास, मानसिक रोग-विकृती किंवा मनाची अन्य कोणतीही विकृती किंवा अक्षमता असा होतो आणि त्यामध्ये छिन्नमनस्कतेचा (स्किझोफ्रेनिया) समावेश होतो ;

(ख) "मानसिक रोग-विकृती" याचा अर्थ, जिचा परिणाम उत्तरवादीच्या अपसामान्यपणे आक्रमक किंवा आत्यंतिक बेजबाबदार वर्तनामध्ये होतो, सातत्याने उद्‌भवणारी मनोविकृती किंवा मानसिक अक्षमता, (मग ती बौद्धिक अपसामान्यता असो किंवा नसो) आणि मग त्याला वैद्यकीय उपचारांची गरज असो अथवा नसो आणि तो त्यासाठी ग्रहणक्षम असो वा नसो असा आहे ; किंवा,

(च) तो संचारी स्वरूपाच्या गुप्त रोगाने पीडित आहे]; किंवा

(छ) तो [6][* * *] कुष्ठरोगाने पीडित आहे मात्र हा रोग विनंती अर्जदारापासून जडलेला नाही ]; किंवा

(ज) उत्तरवादी हयात असता तर ज्यांनी स्वाभाविकपणे त्याच्याबद्दल काही ऐकले असते त्या व्यक्तींनी तो हयात असल्याचे सात वर्षे किंवा त्याहून अधिक काळ ऐकलेले नाही; [7][* * *]

---

[1] १९७६ चा अधिनियम क्रमांक ६८, कलम २६ द्वारे कलम २६ ऐवजी दाखल केले (२७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

[2] १९७० चा अधिनियम क्रमांक २९, कलम ३ द्वारे कलम २७ ला पोटकलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला (१२ ऑगस्ट १९७० रोजी व तेव्हापासून).

[3] १९७६ चा अधिनियम क्रमांक ६८, कलम २७ द्वारे खंड (क) व (ख) ऐवजी दाखल करण्यात आले.

[4] वरील अधिनियमाच्या कलम २७, द्वारे परंतुक वगळण्यात आले (२७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

[5] वरील अधिनियमाच्या कलम २७, द्वारे खंड (ङ) व (च) ऐवजी दाखल करण्यात आले (२७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

[6] १९७६ चा अधिनियम क्रमांक ६८ कलम २७ द्वारे विवक्षित मजकूर वगळण्यात आला (२७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

[7] १९७० चा अधिनियम क्रमांक २९, कलम ३ द्वारे 'किंवा' हा शब्द वगळण्यात आला (१२ ऑगस्ट १९७० रोजी व तेव्हापासून).

[१][**स्पष्टीकरण.–** या पोटकलमात ‘अभित्याग’ याचा अर्थ विवाहातील दुसऱ्या पक्षाने वाजवी कारणाशिवाय आणि विनंती अर्जदाराच्या संमतीशिवाय अथवा इच्छेविरुद्ध अशा विनंती अर्जदाराचा अभित्याग करणे, असा आहे आणि त्यामध्ये, विवाहातील दुसऱ्या पक्षाने विनंती अर्जदाराकडे, बुद्धिपुरस्सर दुर्लक्ष करणे याचा समावेश होतो आणि त्याचे व्याकरणिक फेरबदल आणि सजातीय शब्दप्रयोग याचा अर्थ त्यानुसार लावला जाईल.]

[२][* * *]

[३][* * *]

[१][(१ क) पत्नीला पुढील कारणावरूनही जिल्हा न्यायालयाकडे घटस्फोटासाठी विनंतीअर्ज दाखल करता येईल,–

(एक) तिचा पती, विधिपूर्वक विवाह लावल्यानंतर बलात्कार, समसंभोग किंवा पशुगमन याबद्दल दोषी ठरला आहे ;

**१९५६ चा ७८.** **१९७४ चा २.** **१८९८ चा २५.**

(दोन) पत्नी वेगळी राहत असताना, हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम, १९५६ याच्या कलम १८ खालील दाव्यात, किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम १२५ अन्वये करण्यात आलेल्या कार्यवाहीमध्ये (किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ याच्या तत्सम कलम ४८८ खालील) कार्यवाहीत पत्नी वेगळी राहात असली तरी तिला निर्वाह खर्च देणारा हुकूमनामा किंवा, यथास्थिति, आदेश पतीविरुद्ध काढण्यात आलेला आहे आणि असा हुकूमनामा किंवा आदेश काढल्यानंतर ते पक्ष एक वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी, दांपत्यभावाने एकत्र राहिलेले नाहीत.]

[४][(२) या अधिनियमाच्या आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींना अधीन राहून,

**१९७० चा २९.**

विवाहातील कोणत्याही पक्षास-मग तो विवाह, विशेष विवाह (सुधारणा) अधिनियम, १९७० याच्या प्रारंभापूर्वी वा तदनंतर विधिपूर्वक लावण्यात आलेला असो-पुढील कारणांवरून, जिल्हा न्यायालयात, घटस्फोटासाठी विनंतीअर्ज दाखल करता येईल,–

(एक) विवाहातील पक्ष ज्यामध्ये पक्षकार होते अशा कार्यवाहीमध्ये न्यायिक फारकतीचा हुकूमनामा काढल्यानंतर, ते पक्ष, एक वर्ष किंवा त्याहून अधिक कालावधीकरिता, दांपत्यभावाने पुन्हा एकत्र राहिलेले नाहीत ; किंवा

(दोन) विवाहातील पक्ष, ज्यामध्ये पक्षकार होते अशा कार्यवाहीमध्ये दांपत्याधिकाराच्या प्रत्यास्थापनाचा हुकूमनामा काढल्यानंतर, एक वर्ष किंवा त्याहून अधिक कालावधीपर्यंत त्यांच्यामध्ये दांपत्याधिकार प्रस्थापित झालेले नाहीत.]

**घटस्फोटाच्या कार्यवाहीमध्ये वैकल्पिक अनुतोष देणे.**

[५][(**२७क.** या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीमध्ये, घटस्फोटाच्या हुकूमनाम्याद्वारे विवाह विच्छेदाच्या विनंतीअर्जावर, जेथवर तो विनंतीअर्ज कलम २७ च्या पोटकलम (१) च्या खंड (ज) मध्ये उल्लेखिलेल्या कारणांवर आधारलेला असेल तेथवर ते खेरीज करून न्यायालय, त्या प्रकरणाच्या परिस्थितीचा विचार केल्यावर तसे करणे त्याला न्याय्य वाटल्यास घटस्फोटाच्या हुकूमनाम्याऐवजी, न्यायिक फारकतीचा हुकूमनामा काढू शकेल.]

**परस्पर संमतीने घटस्फोट घेणे.**

**२८.** (१) या अधिनियमातील तरतुदींच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या अधीनतेने, उभय पक्षांना, ते एक वर्षापासून किंवा त्याहून अधिक काळापासून विभक्तपणे राहत आहेत, ते एकत्र राहू शकत नाहीत आणि विवाह विच्छेदित व्हावा याबद्दल त्यांचे परस्परांचे मतैक्य झाले आहे, या कारणावरून उभय पक्षांना जिल्हा न्यायालयाकडे घटस्फोटाकरता संयुक्तपणे विनंतीअर्ज सादर करता येईल.

(२) [६][पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला विनंतीअर्ज ज्या दिनांकास सादर करण्यात आला असेल, त्या दिनांकापासून सहा महिन्यांपेक्षा कमी नसेल एवढ्या कालावधीनंतर] आणि उक्त दिनांकापासून [६][उशिरात उशिरा अठरा महिन्यांच्या आत] उभय पक्षांनी केलेल्या चालना अर्जावरून, दरम्यानच्या काळात विनंतीअर्ज मागे घेण्यात आला नसेल तर, जिल्हा न्यायालय, त्याने पक्षांचे म्हणणे ऐकल्यानंतर व त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, तो विवाह या अधिनियमाखाली विधिपूर्वक लावण्यात आला असून विनंतीअर्जातील विधाने खरी आहेत याबाबत त्याचे समाधान झाल्यावर हुकूमनाम्याच्या दिनांकापासून विवाह विच्छेदित झाल्याचे घोषित करणारा हुकूमनामा काढील.

---

[१] १९७६ चा अधिनियम क्रमांक ६८, कलम २७ द्वारे समाविष्ट करण्यात आले (२७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

[२] वरील अधिनियमाच्या कलम २७, द्वारे विवक्षित मजकूर वगळण्यात आला (२७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

[३] १९७० चा अधिनियम क्रमांक २९, कलम ३ द्वारे खंड (झ) व (ञ) वगळण्यात आले. (१२ ऑगस्ट १९७० रोजी व तेव्हापासून).

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे समाविष्ट करण्यात आले (१२ ऑगस्ट १९७० रोजी व तेव्हापासून).

[५] १९७६ चा अधिनियम क्रमांक ६८, कलम २८ द्वारे समाविष्ट करण्यात आले (२७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

[६] वरील अधिनियमाच्या कलम २९ द्वारे विवक्षित मजकुराऐवजी समाविष्ट करण्यात आला (२७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

**विवाहानंतर पहिल्या तीन वर्षांच्या आत घटस्फोटाच्या विनंतीअर्जावर निर्बंध असणे.**

**२९.** (१) जिल्हा न्यायालयाकडे घटस्फोटासाठी विनंतीअर्ज [१][दाखल करण्याच्या दिनांकास] विवाह प्रमाणपत्र नोंदवहीत विवाह प्रमाणपत्राची नोंद केल्याच्या दिनांकापासून [१][एक वर्ष पूर्ण झाले नसेल] जिल्हा न्यायालयाकडे, घटस्फोटासाठी विनंतीअर्ज दाखल करता येणार नाही :

परंतु असे की, जिल्हा न्यायालय, त्याच्याकडे अर्ज करण्यात आल्यावर, त्या प्रकरणी विनंतीअर्जदाराने अपवादात्मक हालअपेष्टा सोसली आहे किंवा उत्तरवादीच्या पक्षी अपवादात्मक नीतिभ्रष्टता दिसून येत आहे या कारणावरून विवाहाच्या दिनांकापासून [२][एक वर्ष संपण्यापूर्वी] विनंतीअर्ज दाखल केला जाण्यास मुभा देऊ शकेल ; पण विनंतीअर्जदाराने कोणत्याही प्रकारे प्रकरणाच्या स्वरूपाबाबत चुकीचे निवेदन किंवा लपवणूक करून विनंतीअर्ज दाखल करण्यासाठी परवानगी मिळवली आहे असे विनंतीअर्जाच्या सुनावणीच्या वेळी जिल्हा न्यायालयाला दिसून आले तर, जिल्हा न्यायालयाला, त्याने हुकूमनामा अधिघोषित केल्यास, विवाहाच्या दिनांकापासून [३][एक वर्ष पूर्ण होईपर्यंत] हुकूमनामा परिणामक होणार नाही या शर्तीच्या अधीनतेने तसे करता येईल अथवा विनंतीअर्ज अशा प्रकारे खारीज करता येईल की, अशा खारीज करण्यात आलेल्या विनंतीअर्जाच्या पुष्ट्यर्थ शाबीत केलेल्या किंवा सारतः त्याच तथ्यांना धरून [४][उक्त एक वर्ष संपल्यानंतर] जो करता येईल अशा कोणत्याही विनंतीअर्जास त्यामुळे बाध येणार नाही.

(२) विवाहाच्या दिनांकापासून [५][एक वर्ष संपण्यापूर्वी] घटस्फोटाकरता विनंतीअर्ज दाखल करण्याच्या परवानगीसाठी या कलमाखाली करण्यात आलेला अर्ज निकालात काढताना, विवाहातून झालेल्या कोणत्याही अपत्याचे, हितसंबंध आणि [६][उक्त एक वर्ष] संपण्यापूर्वी पक्षांमध्ये सलोखा होण्याची वाजवी संभाव्यता आहे किंवा काय हा प्रश्न, जिल्हा न्यायालय लक्षात घेईल.

**घटस्फोटित व्यक्तींचा पुनर्विवाह.**

**३०.** जर घटस्फोटाच्या हुकूमनाम्याद्वारे विवाह विच्छेद करण्यात आला असेल आणि एकतर हुकूमनाम्याविरुद्ध अपिलाचा हक्क नसेल किंवा असा अपिलाचा हक्क असल्यास अपील करण्याची मुदत अपील दाखल न होता संपून गेलेली असेल किंवा अपील दाखल केलेले असेल, परंतु, ते खारीज करण्यात आले असेल तर, [७][****] विवाहातील कोणत्याही पक्षास पुन्हा विवाह करता येईल.

## प्रकरण सात

## अधिकारिता व कार्यपद्धती

**कोणत्या न्यायालयाकडे विनंतीअर्ज करावा.**

**३१.** [८][(१) प्रकरण पाच किंवा प्रकरण सहा याखालील प्रत्येक विनंतीअर्ज हा, ज्या जिल्हा न्यायालयाच्या मूळ दिवाणी अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये,—

(एक) विधिपूर्वक विवाह लावण्यात आला असेल ; किंवा

(दोन) उत्तरवादी, विनंतीअर्ज दाखल करण्याच्या वेळी, राहत असेल; किंवा

(तीन) विवाहातील पक्षकार अंतिमतः एकत्र राहिले असतील; किंवा

[९][(तीन क) विनंतीअर्जदार ही जर पत्नी असेल तर, विनंतीअर्ज दाखल करण्याच्या दिनांकास ती जेथे राहत असेल ; किंवा]

(चार) जेथे उत्तरवादी हा, विनंतीअर्ज दाखल करण्याच्या वेळी, ज्यावर या अधिनियमांचा विस्तार आहे, अशा राज्यक्षेत्राच्या बाहेर राहत असेल किंवा तो हयात असता तर ज्यांनी स्वाभाविकपणे त्याच्याबद्दल काही ऐकले असते, त्या व्यक्तींनी तो हयात असल्याचे सात वर्षे काही ऐकलेले नाही, अशा प्रकरणामध्ये, जेथे विनंतीअर्जदार राहत असेल ;

अशा जिल्हा न्यायालयाकडे सादर करण्यात येईल.]

---

[१] १९७६ चा अधिनियम क्रमांक ६८, कलम ३० द्वारे विवक्षित मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (२७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३० द्वारे "तीन वर्षे लोटण्यापूर्वी" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (२७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३० द्वारे "तीन वर्षे पूर्ण होईपर्यंत" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (२७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३० द्वारे "उक्त तीन वर्षे संपल्यानंतर" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (२७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

[५] वरील अधिनियमाच्या कलम ३० द्वारे "तीन वर्षे संपल्यानंतर" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (२७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

[६] वरील अधिनियमाच्या कलम ३० द्वारे "उक्त तीन वर्षे" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (२७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

[७] वरील अधिनियमाच्या कलम ३१ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला (२७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

[८] वरील अधिनियमाच्या कलम ३२ द्वारे पोटकलम (१) ऐवजी दाखल करण्यात आले (२७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

[९] २००३ चा अधिनियम क्रमांक ५०, कलम २ द्वारे खंड (तीन क) समाविष्ट करण्यात आला.

(२) पोटकलम (१) अन्वये जिल्हा न्यायालयाकडून वापरता येण्यासारख्या असलेल्या कोणत्याही अधिकारितेला बाध न येता, जिल्हा न्यायालयास या पोटकलमाच्या आधारे, ज्या राज्यक्षेत्रांवर या अधिनियमाचा विस्तार आहे त्यात अधिवासी असलेल्या पत्नीने, विवाहाच्या शून्यतेसाठी किंवा घटस्फोटासाठी केलेला विनंतीअर्ज जर ती उक्त राज्यक्षेत्रातील रहिवासी असेल व विनंतीअर्ज सादर करण्याच्या निकटपूर्व तीन वर्षांच्या कालावधीत ती सामान्यतः तेथील रहिवासी असेल व पती उक्त राज्यक्षेत्रातील रहिवासी नसेल तर विचारार्थ स्वीकारता येईल.

**३२.** (१) प्रकरण पाच किंवा प्रकरण सहा अन्वये केलेल्या प्रत्येक विनंतीअर्जात, अनुतोषाची मागणी ज्यांच्यावर आधारली असेल ती तथ्ये, प्रकरणाच्या स्वरूपानुसार शक्य असेल तितक्या स्पष्टपणे नमूद केलेली असतील आणि विनंतीअर्जदार व विवाहातील दुसरा पक्ष यांनी कोणतेही संगनमत केलेले नाही, असेही त्यात नमूद केलेले असेल. **विनंतीअर्जाचा मजकूर व त्याचे सत्यापन.**

(२) अशा प्रत्येक विनंतीअर्जात अंतर्भूत असलेली निवेदने विनंतीअर्जदाराकडून किंवा अन्य एखाद्या सक्षम व्यक्तीकडून वादपत्र सत्यापनासाठी कायद्यानुसार आवश्यक असलेल्या रीतीने सत्यापित करण्यात येतील आणि सुनावणीच्या वेळी साक्षीपुरावा म्हणून त्यांचा निर्देश करता येईल.

[1][**३३.** (१) या अधिनियमाखालील सर्व कार्यवाही कक्षांतर्गत चालवली जाईल आणि उच्च न्यायालयाचा किंवा सर्वोच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय न्यायालयाच्या पूर्वपरवानगीने मुद्रित वा प्रकाशित करण्याशिवाय अशा कार्यवाहीशी संबंधित कोणतीही बाब मुद्रित वा प्रकाशित करणे हे कोणत्याही व्यक्तीसाठी, कायदेशीर असणार नाही. **कार्यवाही कक्षांतर्गत होणे आणि ती मुद्रित वा प्रकाशित करता न येणे.**

(२) पोटकलम (१) मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींचे उल्लंघन करून कोणत्याही व्यक्तीने कोणतीही बाब मुद्रित वा प्रकाशित केली तर ती, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल.]

**३४.** (१) प्रकरण पाच किंवा प्रकरण सहा खालील कोणत्याही कार्यवाहीत - मग तीत बचाव दिलेला असो वा नसो,— **हुकूमनामे काढणाऱ्या न्यायालयाचे कर्तव्य.**

(क) अनुतोष देण्यासाठीच्या कारणांपैकी कोणतेही कारण अस्तित्वात असेल ; आणि

(ख) [2][जेथे विनंतीअर्ज कलम २७ च्या पोटकलम (१) च्या खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कारणावर आधारलेला असेल तेथे, विनंतीअर्जदार त्यामध्ये निर्देशित केलेल्या संभोगाच्या कृत्यामध्ये कोणत्याही प्रकारे अपराध सहायक झालेला नसेल किंवा त्याने त्याकडे डोळेझाक केलेली नसेल किंवा ते क्षमापित केलेले नसेल, किंवा जेथे विनंतीअर्जाचे कारण क्रूरपणा हे असेल तेथे, विनंतीअर्जदाराने तो क्रूरपणा कोणत्याही प्रकारे क्षमापित केलेला नाही ; आणि

(ग) जेथे परस्पर संमतीच्या कारणावरून घटस्फोट मागितला असेल तेव्हा, अशी संमती बळाने, लबाडीने किंवा गैरवाजवी प्रभावाने मिळवण्यात आलेली नाही ; आणि

(घ) विनंतीअर्ज उत्तरवादीशी संगनमत करून दाखल करण्यात आलेला नसेल किंवा त्याची कार्यवाही तशा प्रकारे चालवण्यात आलेली नसेल ; आणि

(ङ) कार्यवाही दाखल करण्यात कोणताही अनावश्यक किंवा अनुचित विलंब झालेला नाही ; आणि

(च) अनुतोष मंजूर का करण्यात येऊ नये याबाबत अन्य कोणतेही वैध कारण नाही ;

याबाबत न्यायालयाची खात्री पटली असेल तेव्हा अशा प्रकरणी न्यायालय तद्नुसार अशा अनुतोषाचा हुकूमनामा काढील, मात्र अन्यथा काढणार नाही.]

(२) या अधिनियमाखाली कोणताही अनुतोष मंजूर करण्याची कार्यवाही करण्यापूर्वी प्रत्येक प्रकरणी, जेथे त्या प्रकरणाच्या स्वरूपाशी व परिस्थितीशी सुसंगतपणे तसे करणे शक्य असेल तेथे, प्रथमतः पक्षांमध्ये समेट घडवून आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे हे न्यायालयाचे कर्तव्य असेल :

---

[1] १९७६ चा अधिनियम क्रमांक ६८, कलम ३३ द्वारे मूळ कलम ३३ ऐवजी दाखल करण्यात आले (२७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

[2] वरील अधिनियमाच्या कलम ३४ द्वारे विवक्षित मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (२७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

[१][परंतु असे की, कलम २७ च्या पोटकलम (१) च्या खंड (ग), खंड (ङ), खंड (च), खंड (छ) आणि खंड (ज) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कारणांपैकी कोणत्याही कारणांच्या आधारे अनुतोष मागण्यात आला असेल अशा कोणत्याही कार्यवाहीला, या पोटकलमामध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.]

[१][(३) असा समेट घडवून आणण्यात न्यायालयाला मदत करण्याच्या प्रयोजनासाठी, न्यायालयास पक्षकारांची तशी इच्छा असल्यास, किंवा न्यायालयाला तसे करणे न्याय्य व उचित वाटल्यास, पंधरा दिवसांपेक्षा अधिक नसेल एवढ्या वाजवी कालावधीसाठी कार्यवाही स्थगित करता येईल आणि पक्षकारांमध्ये समेट घडवून आणता येईल आणि घडवून आणला आहे किंवा कसे याबाबत न्यायालयाला अहवाल देण्याच्या निदेशासह ती बाब, त्याबाबत पक्षकारांनी नाव सुचविलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे किंवा पक्षकाराने कोणत्याही व्यक्तीचे नाव सूचविले नसेल तर न्यायालयाने नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे सोपवता येईल आणि न्यायालय ती कार्यवाही निकालात काढताना तो अहवाल यथोचित विचारात घेईल.

(४) घटस्फोटाच्या हुकूमनाम्याद्वारे विवाह विच्छेदित करण्यात आला असेल अशा प्रत्येक प्रकरणात, तो हुकूमनामा काढणारे न्यायालय, प्रत्येक पक्षाला, त्या हुकूमनाम्याची प्रत विनामूल्य देईल.]

[२][**घटस्फोटाच्या व इतर कार्यवाहींमध्ये उत्तरवादीला अनुतोष देणे.**

**३५.** घटस्फोटाच्या किंवा न्यायिक फारकतीच्या किंवा दांपत्याधिकारांच्या प्रत्यास्थापनाच्या कोणत्याही कार्यवाहीमध्ये, उत्तरवादीस, विनंतीअर्जदाराचे जारकर्म, क्रूर वागणूक किंवा अभित्याग या कारणांवरून मागितलेल्या अनुतोषास केवळ विरोधच करता येईल असे नव्हे तर, त्या कारणांवरून या अधिनियमान्वये कोणताही अनुतोष मिळण्याचा प्रतिदावादेखील करता येईल, आणि विनंतीअर्जदाराचे जारकर्म, क्रूर वागणूक किंवा अभित्याग सिद्ध झाल्यास, न्यायालयास, जर उत्तरवादीने त्या कारणांवरून अशा अनुतोषाची मागणी करणारा विनंतीअर्ज दाखल केला असता तर, तो या अधिनियमान्वये जो अनुतोष मिळण्यास हक्कदार झाला असता असा कोणताही अनुतोष उत्तरवादीला देता येईल.]

**दावा प्रलंबित असताना पोटगी.**

**३६.** प्रकरण पाच किंवा प्रकरण सहा खालील कोणत्याही कार्यवाहीत, पत्नीला तिच्या उदरनिर्वाहाचा व कार्यवाहीचा खर्च भागविण्यासाठी तिच्याकडे स्वतंत्र उत्पन्न नाही असे जिल्हा न्यायालयाला दिसून येईल त्याबाबतीत न्यायालयास, पत्नीच्या अर्जावरून, कार्यवाहीचा खर्च, आणि पतीचे उत्पन्न लक्षात घेऊन, न्यायालयाला वाजवी वाटेल अशी रक्कम, कार्यवाही चालू असताना दर आठवड्यास किंवा दर महिन्यास तिला देण्यासाठी पतीला आदेश देता येईल :

[३][परंतु असे की, प्रकरण पाच व प्रकरण सहा खालील कार्यवाहीचा खर्च आणि अशी रक्कम, कार्यवाही चालू असताना दर आठवड्यास किंवा दर महिन्यास देण्यासाठीचा अर्ज, शक्यतोवर पतीवर नोटीस बजावल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत निकालात काढण्यात येईल.]

**स्थायी पोटगी व निर्वाह खर्च.**

**३७.** (१) प्रकरण पाच किंवा प्रकरण सहा खालील अधिकारितेचा वापर करणारे कोणतेही न्यायालय कोणताही हुकूमनामा काढण्याच्या वेळी किंवा हुकूमनामा काढल्याच्या नंतर कोणत्याही वेळी, त्या प्रयोजनार्थ त्याच्याकडे केलेल्या अर्जावरून, पती, पत्नीच्या निर्वाहासाठी आणि चरितार्थासाठी, तिची स्वतःची मालमत्ता, कोणतीही असल्यास, तिच्या पतीची मालमत्ता व ऐपत, [४][प्रकरणातील पक्षकारांची वर्तणूक आणि इतर परिस्थिती] लक्षात घेता, न्यायालयाला योग्य वाटेल अशी, ठोक रक्कम किंवा तिच्या हयातीपेक्षा अधिक नसेल इतक्या मुदतीकरिता मासिक किंवा नियतकालिक रक्कम आवश्यकता भासल्यास, पतीच्या मालमत्तेवर बोजा निर्माण करून त्याद्वारे, तिला निश्चितपणे प्राप्त करून देईल, असा आदेश देऊ शकेल.

(२) जिल्हा न्यायालयाने, पोटकलम (१) अन्वये आदेश दिल्यानंतर कोणत्याही वेळी दोहोंपैकी कोणत्याही पक्षाच्या परिस्थितीत बदल झाला असल्याबाबत त्याची खात्री पटली असेल तर, न्यायालय दोहोंपैकी कोणत्याही पक्षाच्या विनंतीवरून, न्यायालयाला योग्य वाटेल अशा रीतीने अशा कोणत्याही आदेशात बदल, फेरबदल करू शकेल किंवा तो विखंडित करू शकेल.

---

[१] १९७६ चा अधिनियम क्रमांक ६८, कलम ३४ द्वारे दाखल करण्यात आले (दिनांक २७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

[२] वरील अधिनियमाच्या, कलम ३५ द्वारे “कलम ३५” ऐवजी दाखल करण्यात आले (दिनांक २७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

[३] २००१ चा अधिनियम क्रमांक ४९, कलम ६ द्वारे नवीन परंतुक समाविष्ट करण्यात आले (दिनांक २४ सप्टेंबर २००१ रोजी व तेव्हापासून).

[४] १९७६ चा अधिनियम क्रमांक ६८, कलम ३६ द्वारे “आणि पक्षकारांची वर्तणूक” या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (दिनांक २७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

(३) पत्नीच्या बाजूने या कलमान्वये आदेश देण्यात आला असेल त्या पत्नीने पुनर्विवाह केला असल्याबाबत किंवा ती व्यभिचारी जीवन जगत असल्याबाबत जिल्हा न्यायालयाची खात्री पटली असेल तर, [1][न्यायालय, पतीच्या विनंतीवरून, न्यायालयाला योग्य वाटेल अशा रीतीने, अशा कोणत्याही आदेशात बदल, फेरबदल करू शकेल किंवा तो विखंडित करू शकेल.]

**अपत्यांचा ताबा.**

**३८.** प्रकरण पाच किंवा प्रकरण सहा खालील कोणत्याही कार्यवाहीत जिल्हा न्यायालय, वेळोवेळी अज्ञान अपत्यांचा ताबा, त्यांचे पालन-पोषण व शिक्षण यांबाबत, शक्य असेल तेथे त्यांच्या इच्छेनुरूप, त्याला न्याय्य व उचित वाटतील असे अंतरिम आदेश देऊ शकेल व अशा तरतुदी हुकूमनाम्यात करू शकेल आणि असे जिल्हा न्यायालय, हुकूमनाम्यानंतर, विनंतीअर्जाद्वारे त्या प्रयोजनार्थ केलेल्या अर्जावरून, अशा अपत्यांचा ताबा, त्यांचे पालनपोषण व शिक्षण यांबाबत अशा हुकूमनाम्याद्वारे किंवा असा हुकूमनामा मिळविण्यासाठीची कार्यवाही प्रलंबित राहिली असती तर, अंतरिम आदेशांद्वारे जे आदेश देता आले असते व ज्या तरतुदी करता आल्या असत्या, असे सर्व आदेश देऊ शकेल व तरतुदी करू शकेल, ते रद्द, निलंबित करू शकेल किंवा त्यांमध्ये बदल करू शकेल :

[2][परंतु असे की, प्रकरण पाच किंवा प्रकरण सहा अन्वये कार्यवाही चालू असताना, अज्ञान अपत्यांचे पालनपोषण व शिक्षण यांबाबतचा अर्ज, शक्यतोवर, उत्तरवादीवर नोटीस बजावल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत निकालात काढण्यात येईल.]

**हुकूमनामे व आदेश यांवरील अपिले.**

[3][**३९.** (१) प्रकरण पाच किंवा प्रकरण सहा खालील कोणत्याही कार्यवाहीत न्यायालयाने काढलेले सर्व हुकूमनामे, पोटकलम (३) च्या तरतुदींच्या अधीन राहून, न्यायालयाने आपल्या मूळ दिवाणी अधिकारितेचा वापर करून काढलेले हुकूमनामे ज्याप्रमाणे अपीलयोग्य असतात त्याप्रमाणेच अपीलयोग्य असतील, आणि असे अपील न्यायालयाने आपल्या मूळ दिवाणी अधिकारितेचा वापर करून दिलेल्या निर्णयावर सर्व सामान्यपणे ज्या न्यायालयाकडे अपील केले जाते, अशा न्यायालयाकडे करण्यात येईल.

(२) या अधिनियमाखालील, कलम ३७ खालील किंवा कलम ३८ खालील कोणत्याही कार्यवाहीत न्यायालयाने दिलेले आदेश, जर ते अंतरिम आदेश नसतील तर, पोटकलम (३) च्या तरतुदींच्या अधीन राहून, अपीलयोग्य असतील आणि असे प्रत्येक अपील, न्यायालयाने आपल्या मूळ अधिकारितेचा वापर करून दिलेल्या निर्णयांवर सर्वसामान्यपणे ज्या न्यायालयाकडे अपील केले जाते अशा न्यायालयाकडे करण्यात येईल.

(३) खर्चाच्या बाबतीत या कलमान्वये कोणतेही अपील करता येणार नाही.

(४) या कलमान्वये, प्रत्येक अपील, हुकूमनामा किंवा आदेश यांच्या दिनांकापासून [4][नव्वद दिवसांच्या आत] करण्यात येईल.]

**१९०८ चा अधिनियम ५ लागू करणे.**

**४०.** या अधिनियमात अंतर्भूत केलेल्या तरतुदींच्या आणि उच्च न्यायालय याबाबतीत करू शकेल अशा
१९०८ चा ५. नियमांच्या अधीन राहून, या अधिनियमाखालील सर्व कार्यवाही शक्य तेथवर, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ याद्वारे विनियमित करण्यात येईल.

**विवक्षित प्रकरणांमध्ये विनंतीअर्ज हस्तांतरित करण्याचे अधिकार.**

[5][**४०क.** (१) जेथे—

(क) कलम २३ खालील न्यायिक फारकतीच्या हुकूमनाम्याची किंवा कलम २७ खालील घटस्फोटाच्या हुकूमनाम्याची मागणी करणाऱ्या विवाहातील एका पक्षाने अधिकारिता असलेल्या जिल्हा न्यायालयाकडे या अधिनियमान्वये विनंतीअर्ज दाखल केलेला असेल ; आणि

(ख) कोणत्याही कारणावरून कलम २३ खालील न्यायिक फारकतीच्या हुकूमनाम्याची किंवा कलम २७ खालील घटस्फोटाच्या हुकूमनाम्याची मागणी करणाऱ्या, विवाहातील अन्य पक्षाने त्यानंतर या अधिनियमान्वये दुसरा विनंतीअर्ज दाखल केलेला असेल–मग तो त्याच जिल्ह्यात किंवा भिन्न जिल्हा न्यायालयात, त्याच राज्यात किंवा भिन्न राज्यात केलेला असो—

तिथे त्या विनंतीअर्जावर कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

---

[1] १९७६ चा अधिनियम क्रमांक ६८, कलम ३६ द्वारे, "न्यायालय, तो आदेश रद्द करील" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला. (दि. २७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

[2] २००१ चा अधिनियम क्रमांक ४९, कलम ७ द्वारे समाविष्ट करण्यात आले (दि. २४ सप्टेंबर २००१ रोजी व तेव्हापासून).

[3] १९७६ चा अधिनियम क्रमांक ६८, कलम ३७ द्वारे ३९ ऐवजी दाखल करण्यात आले.

[4] २००३ चा ५०, कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

[5] १९७६ चा अधिनियम क्रमांक ६८, कलम ३८ द्वारे समाविष्ट करण्यात आले (दि. २७ मे १९७६ रोजी व तेव्हापासून).

(२) पोटकलम (१) लागू असलेल्या प्रकरणात,—

(क) जर विनंतीअर्ज, एकाच जिल्हा न्यायालयात दाखल केलेले असतील तर, जिल्हा न्यायालयाकडून त्या दोन्ही विनंतीअर्जांवर एकत्रित न्यायचौकशी व सुनावणी करण्यात येईल;

(ख) जर विनंतीअर्ज वेगवेगळ्या जिल्हा न्यायालयांमध्ये दाखल केलेले असतील तर, नंतर दाखल केलेला विनंतीअर्ज, जेथे पहिला विनंती अर्ज दाखल केला आहे त्या जिल्हा न्यायालयाकडे हस्तांतरित करण्यात येईल आणि अगोदरचा विनंतीअर्ज दाखल केलेल्या जिल्हा न्यायालयाकडून दोन्ही विनंतीअर्जावर एकत्रित सुनावणी करण्यात येईल व ते निकालात काढण्यात येतील.

(३) पोटकलम (२) खंड (ख) लागू असलेल्या प्रकरणात, नंतरचा विनंतीअर्ज दाखल केलेल्या जिल्हा न्यायालयातून कोणताही वाद किंवा कार्यवाही, अगोदरचा विनंतीअर्ज प्रलंबित असलेल्या जिल्हा न्यायालयात हस्तांतरित करण्यास दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये सक्षम असलेले न्यायालय किंवा, यथास्थिति, शासन, **१९०८ चा ५.**
जणू काही उक्त संहितेअन्वये तसे करण्यास त्यास अधिकार प्रदान करण्यात आले होते असे समजून, असा नंतरचा विनंतीअर्ज हस्तांतरित करण्यासाठी त्याच्या अधिकारांचा वापर करील.

**अधिनियमाखालील विनंतीअर्जांची न्यायचौकशी करण्याच्या आणि ते निकालात काढण्याच्या संबंधातील विशेष तरतुदी.**

**४०ख.** (१) या अधिनियमाखालील विनंतीअर्जाची न्यायचौकशी, त्या न्यायचौकशीसंबंधातील न्याय हितसंबंधांशी सुसंगतपणे व्यवहार्य असेल तेथवर, न्यायालयास लेखी नमूद करावयाच्या कारणास्तव न्यायचौकशी पुढील दिवसानंतरच्या कालावधीसाठी तहकूब करण्याची आवश्यकता भासली असेल त्याखेरीज, निष्कर्षाप्रत येईपर्यंत दररोज चालू ठेवण्यात येईल.

(२) या अधिनियमाखालील प्रत्येक विनंतीअर्जाची न्यायचौकशी शक्य तितक्या शीघ्रतेने करण्यात येईल आणि उत्तरवादीवर विनंतीअर्जाची नोटीस बजावल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत ती न्यायचौकशी पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

(३) या अधिनियमाखालील प्रत्येक अपिलाची सुनावणी शक्य तितक्या शीघ्रतेने करण्यात येईल, आणि उत्तरवादीवर अपिलाची नोटीस बजावल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत सुनावणीचा निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

**लेखी साक्षीपुरावा.**

**४०ग.** एतद्‌विरुद्ध कोणत्याही अधिनियमितीमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, या अधिनियमाखालील न्यायचौकशीच्या कोणत्याही कार्यवाहीमध्ये कोणताही दस्तऐवज हा, त्यावर यथोचित शिक्का उमटविलेला नाही किंवा त्याची नोंदणी केलेली नाही या कारणामुळे साक्षीपुराव्यात अग्राह्य असणार नाही.]

**कार्यपद्धती विनियमित करण्यासाठी नियम करण्याचा उच्च न्यायालयाचा अधिकार.**

**४१.** (१) उच्च न्यायालय, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे प्रकरणे पाच, सहा व सात यांच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनार्थ त्यास इष्ट वाटतील असे या अधिनियमात व दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ यांत **१९०८ चा ५.**
अंतर्भूत असलेल्या तरतुदींशी सुसंगत असलेले नियम तयार करील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, अशा नियमांमध्ये पुढील बाबींची तरतूद करण्यात येईल :—

(क) जारकर्माच्या कारणामुळे घटस्फोटाच्या विनंतीअर्जावरून विनंतीअर्जदाराने जाराला सह उत्तरवादी म्हणून खटल्यात सामील करून घेणे आणि तसे करण्यापासून विनंतीअर्जदाराला कोणत्या परिस्थितीत माफी मिळू शकेल ती परिस्थिती ;

(ख) अशा कोणत्याही सह-उत्तरवादीविरुद्ध नुकसानभरपाई देणे ;

(ग) प्रकरण पाच किंवा प्रकरण सहा याखालील कोणत्याही कार्यवाहीत, त्यात अगोदर पक्षकार नसलेल्या कोणत्याही व्यक्तीने हस्तक्षेप करणे ;

(घ) विवाह शून्यतेच्या किंवा घटस्फोटाच्या विनंतीअर्जाचा नमुना व मजकूर आणि अशा विनंतीअर्जामधील पक्षकारांनी दाव्याचा खर्च देणे ; आणि

(ङ) जिच्यासाठी या अधिनियमात कोणतीही तरतूद किंवा कोणतीही पुरेशी तरतूद केलेली नाही आणि जिच्यासाठी भारतीय घटस्फोट अधिनियम, १८६९ यामध्ये तरतूद केलेली आहे अशी अन्य कोणतीही बाब. **१८६९ चा ४.**

## प्रकरण आठ

## संकीर्ण

**व्यावृत्ती.**

**४२.** या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीचा, त्याच्या तरतुदींनुसार विधिपूर्वक न लावण्यात आलेल्या कोणत्याही विवाहाच्या विधिग्राह्यतेवर परिणाम होणार नाही ; तसेच विवाह करण्याच्या कोणत्याही पद्धतीच्या विधिग्राह्यतेवर हा अधिनियम प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे परिणाम करीत असल्याचे मानले जाणार नाही.

**४३.** प्रकरण तीनमध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त त्या त्या वेळी विवाहित असलेली जी व्यक्ती या अधिनियमाखाली त्याचा किंवा तिचा स्वतःचा विधिपूर्वक विवाह घडवून आणील, अशा प्रत्येक व्यक्तीने **१८६० चा ४५** भारतीय दंड संहिता, १८६० याच्या, यथास्थिति, कलम ४९४ किंवा कलम ४९५ खाली अपराध केला असल्याचे मानले जाईल आणि याप्रमाणे विधिपूर्वक लावण्यात आलेला विवाह शून्य ठरेल. **या अधिनियमाखाली पुन्हा विवाह करणाऱ्या विवाहित व्यक्तीला शिक्षा.**

**४४.** ज्या व्यक्तीचा विवाह या अधिनियमाअन्वये विधिपूर्वक लावण्यात आला असून जी ज्याच्या किंवा तिच्या पत्नीच्या किंवा पतीच्या हयातीत अन्य कोणताही विवाह करील अशी प्रत्येक व्यक्ती, पतीच्या किंवा पत्नीच्या **१८६० चा ४५** हयातीत पुन्हा विवाह करण्याच्या अपराधाबद्दल भारतीय दंड संहिता, १८६० याच्या कलम ४९४ व कलम ४९५ मध्ये तरतूद केलेल्या शिक्षांसाठी पात्र ठरेल आणि याप्रमाणे केलेला विवाह शून्य ठरेल. **द्विविवाहाबद्दल शिक्षा.**

**४५.** या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली आवश्यक असलेले एखादे अभिकथन किंवा प्रमाणपत्र लिहित असेल, स्वाक्षरित केले असेल किंवा साक्षांकित केले असून, त्यामधील एखादे निवेदन खोटे असेल आणि ते खोटे असल्याचे तिला माहीत असेल किंवा तसे ती समजत असेल अगर ते खरे आहे असा विश्वास नसेल अशी प्रत्येक **१८६० चा ४५** व्यक्ती भारतीय दंड संहिता, १८६० याच्या कलम १९९ मध्ये वर्णिलेल्या अपराधाबद्दल दोषी ठरेल. **खोटे अभिकथन किंवा प्रमाणपत्र यावर सही करण्याबद्दल शिक्षा.**

**४६.** जो कोणताही विवाह अधिकारी जाणूनबुजून व बुद्धीपुरस्सर या अधिनियमाखाली एखादा विवाह — **विवाह अधिकाऱ्याच्या अपकृतीबद्दल शिक्षा.**

(१) कलम ५ द्वारे आवश्यक असलेली अशा विवाहाविषयीची नोटीस प्रकाशित केल्याशिवाय, किंवा

(२) अशा विवाहाच्या नोटिशीच्या प्रकाशनापासून तीस दिवसांच्या आत, किंवा

(३) या अधिनियमातील अन्य कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करून,

विधिपूर्वक लावील, तो एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या साध्या कारावासास किंवा पाचशे रुपये असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा या दोन्ही शिक्षांसाठी पात्र ठरेल.

**४७.** (१) या अधिनियमाखाली ठेवलेली विवाह प्रमाणपत्र नोंदवही सर्व वाजवी वेळी निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात येईल आणि त्यात अंतर्भूत असलेल्या निवेदनांचा पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. **विवाह प्रमाणपत्र नोंदवही निरीक्षणार्थ खुली ठेवणे.**

(२) अर्ज केल्यावर विवाह अधिकारी, अर्जदाराला, त्याने विहित फी भरल्यानंतर विवाह प्रमाणपत्र नोंदवहीतील प्रमाणित उतारे देईल.

**४८.** राज्यातील प्रत्येक विवाह अधिकारी विहित करण्यात येईल अशा कालांतराने व अशा नमुन्यामध्ये, अंतिम कालांतर संपल्यापासून, विवाह प्रमाणपत्र नोंदवहीत त्याने केलेल्या सर्व नोंदींची खरी प्रत, त्या राज्यांचे "महानिबंधक जन्म, मृत्यु व विवाह" यांच्याकडे पाठवील, आणि ज्या राज्यक्षेत्रांवर या अधिनियमाचा विस्तार आहे त्या राज्यक्षेत्रांबाहेरील विवाह अधिकाऱ्यांच्याबाबतीत, ती खरी प्रत केंद्र सरकार यासंबंधात विनिर्दिष्ट करील अशा अधिकाऱ्याकडे पाठविण्यात येईल. **विवाह अभिलेखांमधील नोंदीच्या प्रती पाठवणे.**

**४९.** (१) ज्याला विवाह प्रमाणपत्र नोंदवहीतील कोणत्याही नोंदीच्या स्वरूपात किंवा आशयात कोणतीही चूक आढळेल अशा कोणत्याही विवाह अधिकाऱ्यास, अशी चूक आढळल्यानंतर एका महिन्याच्या आत, विवाहित व्यक्तींच्या समक्ष किंवा त्यांचा मृत्यू झाला असल्यास किंवा ते अनुपस्थित असल्यास, अन्य दोन विश्वासार्ह साक्षीदारांच्या समक्ष मूळ नोंदवहीमध्ये कोणताही फेरबदल न करता समासात नोंद करून चूक दुरूस्त करता येईल व समासातील नोंद स्वाक्षरित करून तीत तो अशा दुरूस्तीचा दिनांक घालील आणि असा विवाह अधिकारी, त्यासंबंधीच्या प्रमाणपत्रावर समासातील नोंदीसारखीच नोंद करील. **चुकांची दुरूस्ती.**

(२) या कलमान्वये केलेली प्रत्येक दुरूस्ती ज्यांच्या समक्ष ती करण्यात आली होती त्या साक्षीदारांकडून साक्षांकित करण्यात येईल.

(३) जेथे कलम ४८ खाली कोणत्याही नोंदीची प्रत महानिबंधकाकडे किंवा अन्य प्राधिकाऱ्याकडे आधीच पाठविण्यात आली असेल तेथे, विवाह अधिकारी तशाच रीतीने मूळच्या चुकीच्या नोंदीचे आणि समासात केलेल्या तिच्या दुरूस्त्यांचे एक वेगळे प्रमाणपत्र तयार करून पाठवील.

**५०.** (१) केंद्र सरकारला, केंद्र सरकारचे [१][***] अधिकारी यांच्या बाबतीत, आणि राज्य सरकारला, अन्य सर्व बाबतीत, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. **नियम करण्याचा अधिकार.**

---

[१] १९६९ चा अधिनियम क्रमांक ३३ कलम २९ अन्वये "राजनैतिक व वाणिज्य दौतिक अधिकारी व अन्य" हा मजकूर वगळण्यात आला (३१ ऑगस्ट १९६९ रोजी व तेव्हापासून).

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, अशा नियमांमध्ये पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींची तरतूद करता येईल :–

(क) विवाह अधिकाऱ्यांची कर्तव्ये व अधिकार, आणि ज्या क्षेत्रात त्यांना अधिकारिता वापरता येईल ती क्षेत्रे;

(ख) विवाह अधिकाऱ्याला या अधिनियमाखाली ज्या रीतीने चौकशी करता येईल ती रीत आणि त्याबद्दलची कार्यपद्धती ;

(ग) या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली आवश्यक करण्यात आलेल्या कोणत्याही नोंदवह्या ज्या कोणत्याही नमुन्यात व ज्या रीतीने ठेवल्या जातील असे नमुने व रीत;

(घ) या अधिनियमाअन्वये विवाह अधिकाऱ्याला नेमून दिलेले कोणतेही काम करण्यासाठी आकारता येईल अशी फी;

(ङ) कलम १६ खाली ज्या रीतीने जाहीर नोटीस दिली जाईल ती रीत;

(च) कलम ४८ ला अनुसरून विवाह प्रमाणपत्र नोंदवहीतील नोंदीच्या प्रती ज्या नमुन्यात व ज्या कालांतरांच्या आत पाठवल्या जातील असे नमुने व कालावधी;

(छ) विहित करता येईल किंवा विहित करणे आवश्यक असेल अशी इतर कोणतीही बाब.

[१][(३) या अधिनियमाखाली केंद्र सरकारने केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा, दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत झाले किंवा नियम न करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत झाले तर, त्यानंतर तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच परिणामक होईल, किंवा, यथास्थिति, मूळीच परिणामक होणार नाही. तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

(४) या अधिनियमाअन्वये राज्य शासनाने केलेला प्रत्येक नियम तो केल्यानंतर होईल तितक्या लवकर राज्य विधानमंडळासमोर ठेवण्यात येईल.]

**निरसने व व्यावृत्ती.** **५१.** (१) विशेष विवाह अधिनियम, १८७२ या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी कोणताही भाग ‘ ख ’ मधील राज्यात अंमलात असलेला व विशेष विवाह अधिनियम, १८७२ याच्याशी समनुरूप असा कोणताही कायदा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. **१८७२ चा ३.**

(२) असे निरसन झाले असले तरीही,—

(क) विशेष विवाह अधिनियम, १८७२ या अन्वये किंवा अशा कोणत्याही समनुरूप कायद्यान्वये रीतसर विधिपूर्वक लावण्यात आलेले सर्व विवाह या अधिनियमाखाली विधिपूर्वक लावण्यात आले आहेत असे मानले जाईल; **१८७२ चा ३.**

(ख) हा अधिनियम प्रवर्तित होण्याच्या वेळी कोणत्याही न्यायालयात प्रलंबित असलेले विवाहविषयक वादांसंबंधीचे आणि बाबीसंबंधीचे सर्व दावे व कार्यवाही, शक्य तेथवर, जणू काही ती मुळात या अधिनियमाखालीच तेथे दाखल केली होती असे समजून अशा न्यायालयाकडून त्यांचा परामर्श घेऊन त्यावर निर्णय दिला जाईल.

(३) पोटकलम (२) च्या तरतुदी ह्या सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७ याच्या कलम ६ मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींना बाध न येता, जणू काही समनुरूप कायदा अधिनियमित करण्यात आला होता असे समजून अशा समनुरूप कायद्याच्या निरसनासही लागू होतील. **१८९७ चा १०.**

---

[१] १९८३ चा अधिनियम क्रमांक २०, कलम २ व अनुसूची द्वारे दाखल करण्यात आले (१५ मार्च १९८४ रोजी व तेव्हापासून).

## पहिली अनुसूची

[पहा कलम २ (ख) " प्रतिषिद्ध नातेसंबंधाच्या श्रेणी "]

भाग एक

१. आई
२. वडिलांची विधवा (सावत्र आई)
३. आईची आई
४. आईच्या वडिलांची विधवा (सावत्र आजी)
५. आईच्या आईची आई
६. आईच्या आईच्या वडिलांची विधवा (सावत्र पणजी)
७. आईच्या वडिलांची आई
८. आईच्या वडिलांच्या वडिलांची विधवा (सावत्र पणजी)
९. वडिलांची आई
१०. वडिलांच्या वडिलांची विधवा (सावत्र आजी)
११. वडिलांच्या आईची आई
१२. वडिलांच्या आईच्या वडिलांची विधवा (सावत्र पणजी)
१३. वडिलांच्या वडिलांची आई
१४. वडिलांच्या वडिलांच्या वडिलांची विधवा (सावत्र पणजी)
१५. मुलगी
१६. मुलाची विधवा
१७. मुलीची मुलगी
१८. मुलीच्या मुलाची विधवा
१९. मुलाची मुलगी
२०. मुलाच्या मुलाची विधवा
२१. मुलीच्या मुलीची मुलगी
२२. मुलीच्या मुलीच्या मुलाची विधवा
२३. मुलीच्या मुलाची मुलगी
२४. मुलीच्या मुलाच्या मुलाची विधवा
२५. मुलाच्या मुलीची मुलगी
२६. मुलाच्या मुलीच्या मुलाची विधवा
२७. मुलाच्या मुलाची मुलगी
२८. मुलाच्या मुलाच्या मुलाची विधवा
२९. बहीण
३०. बहिणीची मुलगी
३१. भावाची मुलगी
३२. आईची बहीण
३३. वडिलांची बहीण
३४. वडिलांच्या भावाची मुलगी
३५. वडिलांच्या बहिणीची मुलगी
३६. आईच्या बहिणीची मुलगी
३७. आईच्या भावाची मुलगी

**स्पष्टीकरण.** — या भागाच्या प्रयोजनांकरता, " विधवा " या शब्दप्रयोगात घटस्फोटित पत्नीचा समावेश होतो.

## भाग दोन

१. बडील
२. आईचा पती (सावत्र वडील)
३. वडिलांचे वडील
४. वडिलांच्या आईचा पती (सावत्र आजा)
५. वडिलांच्या वडिलांचे वडील
६. वडिलांच्या वडिलांच्या आईचा पती (सावत्र पणजा)
७. वडिलांच्या आईचे वडील
८. वडिलांच्या आईच्या आईचा पती (सावत्र पणजा)
९. आईचे वडील
१०. आईच्या आईचा पती (सावत्र आजा)
११. आईच्या वडिलांचे वडील
१२. आईच्या वडिलांच्या आईचा पती (सावत्र पणजा)
१३. आईच्या आईचे वडील
१४. आईच्या आईच्या आईचा पती (सावत्र पणजा)
१५. मुलगा
१६. मुलीचा पती
१७. मुलाचा मुलगा
१८. मुलाच्या मुलीचा पती
१९. मुलीचा मुलगा
२०. मुलीच्या मुलीचा पती
२१. मुलाच्या मुलाचा मुलगा
२२. मुलाच्या मुलाच्या मुलीचा पती
२३. मुलाच्या मुलीचा मुलगा
२४. मुलाच्या मुलीच्या मुलीचा पती
२५. मुलीच्या मुलाचा मुलगा
२६. मुलीच्या मुलाच्या मुलीचा पती
२७. मुलीच्या मुलीचा मुलगा
२८. मुलीच्या मुलीच्या मुलीचा पती
२९. भाऊ
३०. भावाचा मुलगा
३१. बहिणीचा मुलगा
३२. आईचा भाऊ
३३. वडिलांचे भाऊ
३४. वडिलांच्या भावाचा मुलगा
३५. वडिलांच्या बहिणीचा मुलगा
३६. आईच्या बहिणीचा मुलगा
३७. आईच्या भावाचा मुलगा

**स्पष्टीकरण.** — या भागाच्या प्रयोजनांकरता, “पती” या शब्दप्रयोगात घटस्फोटित पतीचा समावेश होतो.

दुसरी अनुसूची

(कलम ५ पहा)

**नियोजित विवाहाची नोटीस**

प्रति,

विवाह अधिकारी, जिल्हा ______________________, यास,

आम्ही याद्वारे आपणांस अशी नोटीस देतो की, या नोटिशीच्या दिनांकापासून तीन कॅलेंडर महिन्यांच्या आत 'विशेष विवाह अधिनियम, १९५४' याखाली आम्ही विधिपूर्वक विवाहबद्ध होण्याचे योजले आहे.

| नाव | स्थिती | व्यवसाय | वय | राहण्याचे ठिकाण | सध्याचे राहण्याचे ठिकाण कायम नसल्यास, कायम राहण्याचे ठिकाण | वास्तव्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| क.ख. | अविवाहित<br>विधुर<br>घटस्फोटित | | | | | |
| ग.घ. | अविवाहित<br>विधवा<br>घटस्फोटित | | | | | |

याची साक्ष म्हणून आज दिनांक ______________ १९ रोजी आम्ही सह्या करीत आहोत.

(सही) क.ख.

(सही) ग.घ.

तिसरी अनुसूची

(कलम ११ पहा)

**वराने करावयाचे अधिकथन**

मी, क. ख. याद्वारे पुढीलप्रमाणे अधिकथन करीत आहे :—

१. मी सध्या अविवाहित (किंवा, यथास्थिति, विधुर किंवा घटस्फोटित) आहे.

२. मी वयाची ............. वर्षे पूर्ण केली आहेत.

३. माझे ग. घ. शी (वधूशी) प्रतिषिद्ध नातेसंबंधाच्या श्रेणीच्या अंतर्गत नाते नाही.

४. जर या अधिकथनातील कोणतेही निवेदन खोटे असेल आणि असे निवेदन करताना मला ते खोटे असल्याचे माहीत असेल किंवा मी तसे समजत असेल किंवा ते खरे आहे असे मी समजत नसेल तर, मी कारावासास आणि द्रव्यदंडासही पात्र ठरेन, याची मला जाणीव आहे.

(सही) क. ख. (वर)

**वधूने करावयाचे अधिकथन**

मी, ग. घ. याद्वारे पुढीलप्रमाणे अधिकथन करीत आहे :—

१. मी सध्या अविवाहित (किंवा, यथास्थिति, विधवा किंवा घटस्फोटित) आहे.

२. मी वयाची ............. वर्षे पूर्ण केली आहेत.

३. माझे क. ख. शी (वराशी) प्रतिषिद्ध नातेसंबंधाच्या श्रेणीच्या अंतर्गत नाते नाही.

४. जर या अधिकथनातील कोणतेही निवेदन खोटे असून असे निवेदन करताना ते खोटे असल्याचे माहीत असेल किंवा मी तसे समजत असेल किंवा ते खरे आहे असे मी समजत नसेल तर, मी कारावासास आणि द्रव्यदंडासही पात्र ठरेन, याची मला जाणीव आहे.

(सही) ग. घ. (वधू)

उपरोक्त क. ख. आणि ग. घ. यांनी आमच्या समक्ष सही केली. आमच्या माहितीप्रमाणे या विवाहास कोणतीही कायदेशीर आडकाठी नाही.

(सही) छ. ज.<br>
(सही) झ. ञ. } तीन साक्षीदार<br>
(सही) ट. ठ.

प्रतिस्वाक्षरी - ङ. च.

दिनांक ............माहे............२० ......... .

विवाह अधिकारी.

चौथी अनुसूची

(कलम १३ पहा)

**विवाह प्रमाणपत्र**

मी, ङ. च. याद्वारे प्रमाणित करतो की, दिनांक........... माहे ............ १९ ....... रोजी क. ख. आणि ग. घ. *(येथे पक्षांचा तपशील द्यावा) हे माझ्यासमोर उपस्थित झाले आणि त्यांच्यापैकी प्रत्येकाने माझ्यासमक्ष व खाली ज्यांनी सह्या केल्या आहेत त्या तीन साक्षीदारांसमक्ष, कलम ११ द्वारे आवश्यक असलेली अधिकथने केली आणि या अधिनियमाखाली माझ्यासमक्ष त्यांचा विधिपूर्वक विवाह लावण्यात आला.

(सही) ङ. च.,
विवाह अधिकारी,

(सही) क. ख.,
(वर)

(सही) ग. घ.,
(वधू)

(सही) छ. ज.
(सही) झ. ञ.
(सही) ट. ठ.
} तीन साक्षीदार

दिनांक ............ माहे ............. १९ .

* या ठिकाणी पक्षांचा तपशील द्यावा.

पाचवी अनुसूची

(कलम १६ पहा)

**अन्य प्रकारे लावण्यात आलेल्या**

**विवाहाचे प्रमाणपत्र**

मी, ङ. च. याद्वारे प्रमाणित करतो की, दिनांक........... माहे ............ १९ ....... रोजी क. ख. आणि ग. घ. *(येथे पक्षांचा तपशील द्यावा) हे माझ्यासमोर उपस्थित झाले आणि त्यांच्यापैकी प्रत्येकाने माझ्यासमक्ष व खाली ज्यांनी सह्या केल्या आहेत त्या तीन साक्षीदारांसमक्ष असे अभिकथन केले की, त्यांचा विवाह लावण्यात आला आहे आणि त्यांचा विवाह झाल्यापासून ते पतिपत्नी म्हणून एकत्र राहात आहेत, आणि या अधिनियमाखाली आपल्या विवाहाची नोंदणी केली जावी या त्यांच्या इच्छेनुसार, उक्त विवाह ............ या दिनांकापासून घडून आला अशी त्याची नोंदणी दिनांक........... माहे ............ १९ ....... रोजी करण्यात आली असून, तेव्हापासून ती परिणामक होत आहे.

(सही) ङ. च.,
विवाह अधिकारी,

(सही) क. ख.,
पती

(सही) ग. घ.,
पत्नी

(सही) छ. ज.
(सही) झ. ञ. } तीन साक्षीदार
(सही) ट. ठ.

दिनांक ............ माहे ............. १९ .

* या ठिकाणी पक्षांचा तपशील द्यावा.

दि स्पेशल मॅरिज ॲक्ट, १९५४ चा वरील मराठी अनुवाद हा प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३, कलम २ खंड (क) अन्वये **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यासाठी राष्ट्रपती महोदयांनी प्राधिकृत केला आहे.

**सचिव, भारत सरकार.**

दि स्पेशल मॅरिज एक्ट, १९५४ के उपर्युक्त मराठी अनुवाद को प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ की धारा २ के खण्ड (क) के अधीन **शासकीय राजपत्र** में प्रकाशित किए जाने के लिए राष्ट्रपतिने प्राधिकृत कर दिया है ।

**सचिव, भारत सरकार ।**

The above translation in Marathi of the Special Marriage Act, 1954 has been, authorised by the President to be published in the *Official Gazette* under clause (*a*) of section 2 of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973.

New Delhi,

Dated **Secretary to the Government of India.**